रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२९
www.ramprahar.com

◆ बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य'/२
अल्पवयीन मुलीचा विनयभंग; दुकानदाराला अटक/५
दक्षिण आफ्रिकेने ठेवले ५४९ धावांचे मोठे लक्ष्य/८

## 'देवाभाऊ सीएम असेपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही'



**अकोला** : अयोध्येत मंदिर झाल्यानंतर कळस आणि धर्मध्वजाचे अनावरण झाले. अयोध्येच्या मंदिरावर जसा भगवा फडकला तसाच भगवा नगरपालिकेवर फडकवा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २५) अकोला जिल्ह्यातील हिवरखेडमध्ये केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गरिबांना घरे, शिक्षण आणि आरोग्य सुविधा दिल्या. आमच्या महाराष्ट्रातील विजयाला २३ नोव्हेंबरला एक वर्ष पूर्ण झाले. लोक म्हणत होते आता हे सरकार लाडकी बहीण योजना बंद करणार, पण मी माझ्या बहिणींना सांगतो की, जोपर्यंत तुमचा देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होऊ देणार नाही. आम्ही निवडणुका जिंकण्यापुरते आश्वासन देणारे लोक नाही, तर लोकांसोबत राहून त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारे लोक आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

# माथेरानच्या पर्यटनवाढीसाठी प्रयत्न करणार

## मंत्री शंभूराज देसाई यांची ग्वाही; महायुतीची जाहीर सभा

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान हे एक सुंदर पर्यटनस्थळ आहे. येथील पर्यटन वाढावे यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील तसेच त्याकरिता लागेल तेवढा निधी आम्ही देऊ, अशी ग्वाही राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी मंगळवारी (दि. २५) येथे दिली. ते भाजप, शिवसेना, रिपाइं मित्रपक्ष महायुतीच्या जाहीर सभेत बोलत होते.



माथेरान गिरीस्थान नगर परिषदेच्या निवडणूक रिंगणात असलेले महायुतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी आणि नगरसेवकपदाचे २० उमेदवार यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेच आयोजन माथेरान येथील मुख्य बाजारपेठेत असलेल्या श्री राम चौकात करण्यात आले होते. व्यासपीठावर पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह मावळचे खासदार श्रीरंग बारणे, भाजप रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत विधानसभा अध्यक्ष किरण ठाकरे, जि.प.चे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, युवासेनेचे प्रसाद थोरवे व अन्य मान्यवर उपस्थित होते. माथेरानमधील या पहिल्याच राजकीय सभेसाठी महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत येथील स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महायुतीच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन मंत्री देसाई यांनी केले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या भाषणात माथेरानमधील बंद होणारी मिनीट्रेन पुन्हा सुरू व्हावी यासाठी प्रयत्न केल्याचे व निधी पडून दिला नसल्याचे सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथील पर्यायी रस्त्यासाठी मी माथेरानवासीयांसोबत असल्याचे सांगितले. फिनिक्युलर रेल्वे व रोप वे प्रकल्प सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. आमदार महेंद्र थोरवे यांनी, पार्किंगचा प्रश्न गांभीर्याने घेतला असून यासाठी एमपी ९३ प्लॉट नगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी जलद गतीने प्रयत्न केले जातील, असे म्हटले. यासाठी महायुतीच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे आणि पुन्हा एकदा माथेरान नगरपालिकेवर भगवा झेंडा फडकला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

माथेरान शिवसेना शहरप्रमुख मनोज खेडकर यांनी प्रास्ताविक केले, तर भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करीत सगळ्यांचे आभार मानले.

# अयोध्येतील राम मंदिरावर धर्म ध्वजारोहण



## शिवरायांसारखे स्वराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न -पंतप्रधान मोदी

**अयोध्या : वृत्तसंस्था**



अयोध्येतील राम मंदिरावर मंगळवारी (दि. २५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते धर्म ध्वजाचे रोहण करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी जवळपास ५०० वर्षांपूर्वीपासूनचा संकल्प पूर्ण झाला असून आज संपूर्ण जग राममय झाल्याचे उद्गार काढले तसेच त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या स्वराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न करीत असल्याचेही नमूद केले.

या सोहळ्यास उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्यासह अनेक राजकीय नेते, मान्यवर, निमंत्रित पाहुणे आणि शेकडो साधू-संत-महंत उपस्थित होते.

धर्म ध्वजारोहणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, हा धर्मध्वज फक्त एक ध्वज नाही तो भारतीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा ध्वज आहे. यातील भगवा रंग, सूर्यवंशाचे चिन्ह आहे. 'ओम' शब्द आणि कोविदार वृक्ष रामराज्याच्या वैभवाचे प्रतिरूप आहेत. हा ध्वज एक संकल्प आहे. संघर्षाची गाथा आहे. येणाऱ्या हजारो शतकांपर्यंत हा ध्वज श्रीरामांच्या मूल्यांचा प्रचार करेल. सत्य हाच धर्म आहे. कोणताही भेदभाव नसेल. शांतता आणि आनंद असेल.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, आपल्या धर्मग्रंथात जेवढे महत्त्व मंदिराला आहे तेवढेच ते त्यावरील ध्वजाला आहे. जे मंदिरात जाऊन दर्शन घेऊ शकत नाहीत ते ध्वजासमोर नतमस्तक होतात. हा ध्वज दूरूनच रामलल्लाच्या जन्मस्थानाची झलक देईल आणि भगवान श्रीरामाचे आदेश, प्रेरणा सर्व मानवतेला युगायुगापर्यंत पोहचवत राहील. या अविस्मरणीय क्षणी मी जगभरातील कोट्यवधी रामभक्तांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. राम मंदिराच्या उभारणीत ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या प्रत्येकाचे मी आभार मानतो.

### मानसिक गुलामी संपवूया...!

या वेळी संबोधनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढील १० वर्षे भारताला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करण्याचे ध्येय घेऊन पुढे जायचे आहे, असा एक मोठा संकल्प देशाला दिला आहे. या गुलामगिरीच्या मानसिकतेचा पगडा एवढा जबरदस्त आहे की, श्रीराम काल्पनिक होते, असेही म्हटले गेले, परंतु आता श्रीराम काल्पनिक होते असे म्हणणारी गुलामी संपवू, असा निर्धार पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला. पुढील एक हजार वर्षांसाठी भारताचा पाया मजबूत करायचा आहे, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी या वेळी केले.

## कर्जतमध्ये महायुतीच्या संकल्पनामा व वचननाम्याचे प्रकाशन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद निवडणुकीला एकजुटीने सामोरे जाणाऱ्या शिवसेना, भाजप, रिपाइं महायुतीच्या संकल्पनामा आणि वचननाम्याचे प्रकाशन मंगळवारी (दि. २५) पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

कर्जत येथील बाळासाहेब भवन येथे या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास मावळचे खासदार श्रीरंग बारणे, भाजप रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. स्वाती लाड आणि नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

या वेळी मंत्री शंभूराज देसाई यांनी आमदार थोरवे यांनी कर्जत शहरात तब्बल ११९ कोटी रुपयांची विकासकामे केल्याचे सांगून स्थानिक पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक उपक्रम अशा अनेक समस्यांवर वेळोवेळी लक्ष देऊन उपाययोजना केल्याचे नमूद केले. विकासकामे हीच आमची ओळख असून जनतेचा कौल महायुतीच्या बाजूने मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### निवडक

**टी-२० वर्ल्डकपचे वेळापत्रक जाहीर! भारत-पाक एकाच गटात**

**मुंबई** : भारत-श्रीलंकेच्या यजमानपदाखाली आयोजित १०व्या हंगामातील टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचे वेळापत्रक मंगळवारी (दि. २५) जाहीर करण्यात आले. आगामी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेला ७ फेब्रुवारी २०२६पासून सुरुवात होणार असून ८ मार्च रोजी या स्पर्धेची फायनल खेळवण्यात येणार आहे. भारत आणि श्रीलंकेच्या मैदानात या स्पर्धेतील सामने खेळवण्यात येतील. कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तानचे संघ एकाच गटात आहेत.

**वसईत विषारी वायूची गळती; १३ जण बाधित**

**वसई** : वसई पश्चिमेच्या दिवाणमान परिसरात पाण्याच्या टाकीजवळ असणाऱ्या सिलिंडरमधून मंगळवारी (दि. २५) सायंकाळी ४च्या सुमारास विषारी वायूची गळती झाली. यामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास झाला असून एकूण १३ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दक्षता म्हणून महापालिका अधिकाऱ्यांनी पाण्याच्या टाकीसमोरील दोन इमारती खाली केल्या.

## रायगडात नगरसेवकपदाचे आठ उमेदवार बिनविरोध विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण, अलिबाग आणि रोहा या तीन नगर परिषदांमध्ये एकूण आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. पेण पालिकेत सर्वाधिक सहा, तर अलिबाग आणि रोह्यामध्ये प्रत्येकी एक नगरसेवक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. नगराध्यक्षपदासाठी सर्व ठिकाणी लढत होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक चार नगरसेवक बिनविरोध निवडून आले. भाजपचे तीन आणि शेकापचा एक नगरसेवक बिनविरोध निवडून आला आहे. रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरुड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या १० नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपदासाठी लढत होणार आहे. १० पालिकांमध्ये २१७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यापैकी आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यामुळे आता २०९ नगरसेवकपदासाठी निवडणूक होईल.

पेण नगर परिषदेत मालती म्हात्रे, स्मिता माळी, अभिराज कडू (भाजप), दीपक गुरव, वसुधा पाटील, सुशीला ठाकूर (राष्ट्रवादी काँग्रेस), रोहा नगर परिषदेत राजेंद्र जैन (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि अलिबागमध्ये नगर परिषदेत प्रशांत नाईक (शेकाप) हे नगरसेवकपदी बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित जागांवर निवडणूक होत आहे.

जिल्ह्यात १० नगर परिषदांमध्ये कुणीही उमेदवारीवर आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे २६ नोव्हेंबर रोजी सर्व अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप केले जाणार आहे.

### माथेरानमध्ये शेकापचा महायुतीला पाठिंबा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान गिरीस्थान नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना येथे शेतकरी कामगार पक्षाने महायुतीला पाठिंबा जाहीर केला आहे. याबाबतचे पत्र शेकापचे माथेरान शहर अध्यक्ष उमेश कदम यांनी दिले. यामुळे महायुतीची ताकद आणखी वाढली आहे.

भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि आरपीआय यांची महायुती माथेरान नगरपालिका निवडणूक लढवत असून उमेदवारांचा जोरदार प्रचार सुरू आहे. अशातच शेतकरी कामगार पक्षाने येथे महायुतीला जाहीर पाठिंबा दिला आहे. शेकाप माथेरान शहर अध्यक्ष उमेश कदम यांनी या पाठिंब्याचे पत्र दिले. यामुळे महायुतीचे बळ अधिक वाढले आहे. नगराध्यक्षपदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी व नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असे बोलले जात आहे.



**पनवेल : येथील पंचायत समितीच्या माजी सभापती देवकीबाई कातकरी यांचे नुकतेच निधन झाले. या पार्श्वभूमीवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनी कोंबडभुजे येथे जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी शैलेश भगत, निलेश खारकर, वितेश म्हात्रे, श्री. पिल्ले, बाळाराम पाटील पंढरीनाथ भगत, देवराम भगत, अंकुश पाटील, विजय भोईर, चंद्रकांत भगत, आर.एस. कोळी, गुरूनाथ भगत, सूरज भगत, सचिन भगत, चेतन मढवी, अशोक भगत आदी उपस्थित होते.**



## पनवेलच्या धाकटा खांदा येथे ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १४, धाकटा खांदा येथे अमृत (२.०) योजनेंतर्गत ड्रेनेज लाईनच्या कामाचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २५) करण्यात आला. माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे यांच्या प्रयत्नातून हे काम होत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल परिसरात विकासाची अनेक कामे मार्गी लागत असून नागरिकांना सुविधा प्राप्त होत आहे. याच अनुषंगाने धाकटा खांदा स्मशानभूमीजवळ महापालिकेच्या माध्यमातून सुमारे १.५० कोटी रुपये खर्च करून ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

भूमिपूजन समारंभास माजी नगरसेविका सारिका भगत, जैनब शेख, हेमलता म्हात्रे, माजी नगरसेवक महेंद्र कावळे, मुकीत काझी, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, उज्वला पाटील, सतीश पाटील, परेश पाटील, **(पान २ वर..)**


## निवडणूक आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राज्यातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथे आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. २५) निवडणूक आयोगाला केली. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी कोर्टाने शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर हीज सुनावणी झाली. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा सुरू असल्याची माहिती राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली, तर २ डिसेंबर रोजी होणाऱ्या २४२ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ५७ संस्थांमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी दिली. त्यावर या प्रकरणाच्या निकालावर हे अतिरिक्त आरक्षण अवलंबून असेल, अशी तोंडी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली.



# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास शासनाचे प्रथम प्राधान्य -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना अर्थार्जनासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानांतर्गत काम सुरू आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान आणि राह फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार निश्चितच व्यापक प्रमाणावर विस्तार करण्यास सहायक ठरेल , असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान आणि राह फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रामुख्याने पालघर, नाशिक आणि रायगड या भागातील आदिवासी तसेच ग्रामीण महिलांसाठी त्यांच्या अंगभूत कौशल्याचा आणि स्थानिक संसाधनाचा वापर करून संधीचा विस्तार करण्यात येणार आहे. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी उमेदसह विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत. राह फाऊंडेशन सोबतच्या सामंजस्य कराराने या तीन जिल्ह्यांतील महिलांना तांत्रिक ज्ञान, अद्ययावत माहिती यांच्या सहाय्याने अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव प्रयत्न करण्यात येणार आहे.

**कराराचा उद्देश**

या कराराचा उद्देश पालघर, नाशिक आणि रायगड जिल्ह्यांतील महिलांना हवामान, स्मार्ट शेती, जलसुरक्षा आणि निसर्गाधारित उपजीविका उपक्रमांद्वारे सक्षम करणे आहे. राह फाउंडेशनचे तांत्रिक ज्ञान आणि उमेदच्या स्वयं–सहायता गटांचे विस्तृत जाळे यांचा समन्वय साधून ग्रामीण महिलांना साधन संपत्ती, प्रशिक्षण आणि बाजार पेठेतील संधी मिळतील.

**राबविण्यात येणारे उपक्रम**

या भागीदारीअंतर्गत तीनही जिल्ह्यांमध्ये दोन नर्सरी विकास व जैव–उत्पादन केंद्रे उभारली जाणार असून ५ हजारांहून अधिक महिला आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच महिलांच्या सहभागाने फूड फॉरेस्ट प्रकल्प उभारला जाणार आहे, ज्यातून प्रत्येक महिलेला वर्षाला १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. या उपक्रमांतर्गत वन धन योजना, पीएमएफएमई, एनएचएम, आरसेटीआय यासारख्या विविध शासकीय योजनांशी एकत्रिकरण करून महिला शेतकऱ्यांना कर्ज, विमा, बाजारपेठ व प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहे.

उमेद–एमएसआरएलएम आणि राह फाउंडेशनचे हे सहकार्य महाराष्ट्राच्या व्हिजन २०३०, शाश्वत विकास उद्दिष्टे आणि राष्ट्रीय हवामान बांधिलकी यांच्याशी सुसंगत महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचे आदर्श मॉडेल निर्माण करण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## गव्हाण ज्युनिअर कॉलेजमध्ये गरुडझेप अकॅडमीचे स्पर्धा परीक्षा समुपदेशन



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

एम.पी.एस.सी.,यु.पी.एस. सी.तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती, सैन्यदल भरती इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी महाराष्ट्रातील नाशिकच्या सुप्रसिद्ध यशस्वी 'गरूडझेप ' अकॅडमीच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता अकरावी,बारावी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक प्रा.राजू देशमुख यांचे स्पर्धा परीक्षा समुपदेशन तथा व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी भाषणात विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य करिअर मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, अर्चना पाटील, जयराम सोनटक्के आदी उपस्थित होते.

## 'वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवा'



**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरणाकडे विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने वायू प्रदूषणावर प्रतिबंध आणण्याकरिता बांधकाम साईट, दगड खाणी, सिमेंट निर्मितीचे आरएमसी प्लान्ट याकडे प्राधान्याने लक्ष दयावे व त्यासोबतच वाहनांमुळे होणारे प्रदूषण, तंदूर भट्टयांमुळे होणारे प्रदूषण कमी होण्यासाठीही प्रयत्न करावेत असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले.

थंडीमुळे व वायू प्रदूषणामुळे हवेतील धुरके वाढले असून ते कमी होण्यासाठी सतर्कता राखत ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची गरज विशद करीत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईट्सवर धूळ प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपरणे राबविल्या जात असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून खात्री करावी व त्यामध्ये त्रुटी आढळल्यास साईटवरील बांधकाम आठवडयाभरासाठी बंद करावे असे निर्देश दिले. याकरिता नगररचना विभाग व विभाग कार्यालयातील अभियंत्यांनी आपापल्या क्षेत्रातील बांधकाम साईट्सवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व त्याचा अहवाल जलद सादर करावा असे निर्देशित केले.

सध्या वारा वाहण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने हवेतील धुरके वाढले असून त्यावर नियंत्रणासाठी मुख्य रहदारीचे रस्ते व एमआयडीसी क्षेत्रातील रस्ते याठिकाणी रस्त्यांच्या कडेला असलेली माती वाहनांच्या वेगामुळे हवेत उडून धुळीचे प्रमाण वाढते हे लक्षात घेत ती साफ करावी व उचलून नेण्याची धडक मोहीम राबवावी असेही निर्देशित केले. अशाप्रकारे रस्त्यांच्या कडेची माती साफ करण्याची प्रक्रिया दर १५ दिवसांनी राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

कॉरी साईट्स व सिमेंट निर्मितीचे आरएमसी प्लांट याठिकाणीही प्रदूषण प्रतिबंधाचे नियम पाळले जात असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून खातरजमा करावी व अहवाल दयावा असे आयुक्तांनी निर्देशित केले. अशाच प्रकारे बेकरीत कोळशाचा वापर होत असेल तर तो बंद करावा तसेच तंदूरसाठी हॉटेलमध्ये होणाऱ्या कोळशाच्या वापरासही प्रतिबंध करावा, त्याचप्रमाणे कुठे कचरा जाळला जात असेल तर त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी असे आयुक्तांनी सूचित केले.

पर्यावरण संरक्षरणाच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे बनविण्यात आलेल्या गॅस शवदाहिनी व विदयुत शवदाहिनी वापरात आणून स्मशानभूमीतही पर्यावरणपूरक संकल्पना राबवावी व त्यासाठी नागरिकांना प्रोत्साहीत करावे असे आयुक्तांनी सूचित केले.

## औषध क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन व विकासासाठी सुविधायुक्त भव्य केंद्र उभारणार –मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई : प्रतिनिधी**

आरोग्य विज्ञानासाठी जैवतंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरत असून औषध क्षेत्रातील अशा नावीन्यपूर्ण संशोधन आणि विकासासाठी (लाईफ सायन्सेस इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर) सुविधायुक्त भव्य केंद्र उभारण्यासाठी कार्यवाही केली जाईल. असे इनोवेशन पार्क ही काळाची गरज असून याच्या उभारणीतून महाराष्ट्र नावीन्यपूर्ण औषध निर्मिती क्षेत्रात आघाडीवर राहील, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.

मंत्रालयात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ



यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस अन्न व औषध प्रशासन विभागातील सहआयुक्त (दक्षता) डॉ. राहुल खाडे, सहआयुक्त (औषधे) दा रा गहाणे, गिरीश हुकरे, व्ही. टी.जाधव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री झिरवाळ म्हणाले, देशातील गुजरात, आंध्र प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या ठिकाणी संशोधन केंद्र उभी राहत असून औषधांसंदर्भात जैविक व रासायनिक संशोधनासाठी फॉर्म्युलेशन लॅबची सार्वजनिक–खासगी भागीदारीतून देखील उभारणी केली जात आहे. या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट औषधनिर्माण, बायोटेक, मेडिकल उपकरणे, डायग्नोस्टिक्स आणि डिजिटल हेल्थ क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सना आधुनिक सुविधा, तांत्रिक मार्गदर्शन तसेच निधी उपलब्ध करुन देणे असणार आहे.

यातून राज्यातील औषध निर्मिती उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढ होईल, स्टार्टअप्सना मार्गदर्शन, प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील. रोजगार निर्मिती होईल. जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी परिपूर्ण संशोधन संस्था म्हणून ही संस्था काम करेल. असेही मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.



**कर्जत : नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष–शिवसेना–आरपीआय महायुतीकडून थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्वाती लाड, प्रभाग सात अ चे उमेदवार वैभव सुरावकर आणि सात बच्या उमेदवार गौरी जोशी यांच्या प्रचारार्थ पनवेलमधील भाजपचे माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, कविता ठाकूर, प्रशांत शेट्ये, केदार भगत, मनिषा बहिरा, सुमित झुंझारराव, भाऊ भगत, अक्षया चितळे, उज्वला पाटील, अमित ओझे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## बेपत्ता तरुणाचा शोध

**पनवेल :** रामप्रहर वृत्त

मावशीकडे गेल्या एक महिन्यापासून राहायला गेलेला १९ वर्षीय मुलगा कोणास काही एक न सांगता मावशीच्या घरातून निघून गेला. तो अद्याप त्याच्या घरी परत न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बेपत्ता मुलाचे नाव अमित तानाजी पिसाळ असून त्याची उंची पाच फूट, रंग सावळा, चेहरा उभट, अंगाने सडपातळ आहे. त्याचे डोळे काळे, नाक सरळ असून त्याला मराठी व हिंदी भाषा येतात. अशा वर्णनाचा तरुण कोणास दिसल्याने त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस हवालदार डी.बी. कुलाडे यांनी केले आहे.

## प्रशांत देशमुख यांनी दिली रवा दिघे यांच्या निवासस्थानी भेट

**खोपोली :** १८ व्या महात्मा फुले राजस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेले श्री प्रशांत देशमुख यांनी कोकणचे साहित्यकार कै र.वा. दिघे यांच्या कुटुंबाची भेट pravin व आशीर्वाद घेण्यासाठी घरी आले होते त्यांचे स्वागत र वा यांचे चिरंजीव वामन दिघे व स्नुषा उज्वला दिघे यांनी करून त्यांना पुस्तक भेट दिले.



## शासकीय विद्यानिकेतनच्या समस्या सोडविण्यासाठी शासन सकारात्मक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील शासकीय विद्यानिकेतनमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर रिक्त पदे भरण्याबरोबरच इतर समस्या सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी सांगितले.

शासकीय विद्यानिकेतन शाळेच्या विविध समस्या सोडविण्याबाबत प्रधान सचिव देओल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, परीक्षा परिषदेचे आयुक्त नंदकुमार बेडसे, सहसचिव मोईन ताशीलदार, उपसचिव समीर सावंत, उपसचिव तुषार महाजन, शिक्षण संचालक शरद गोसावी, सर्व विद्यानिकेतनचे प्राचार्य, माजी विद्यार्थी आदी यावेळी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकास होण्यासाठी तत्कालीन शिक्षण मंत्री मधुकरराव चौधरी यांच्या संकल्पनेतून राज्यात १९६६–६७ या वर्षी शासकीय विद्यानिकेतन या निवासी शाळा सुरू करण्यात आल्या.

## भारतीय स्त्रीशक्तीचे जगाला विराट दर्शन –उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

ढाका येथे झालेल्या महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चायनीज तैपेइचा ३५–२८ असा पराभव करून भारतीय महिला कबड्डी संघाने विश्वविजेतेपद पटकावले. भारतीय महिला खेळाडूंनी चिकाटी, जिद्द आणि संघभावनेच्या जोरावर जगासमोर भारतीय स्त्रीशक्तीचे विराट सामर्थ्य अधोरेखित केले आहे. हा विजय केवळ क्रीडाक्षेत्रातील पराक्रम नसून देशातील लाखो मुलींना प्रेरणा देणारा ऐतिहासिक क्षण आहे. भारतीय महिलांची विक्रमी कामगिरी नव्या भारताच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारी असून, त्यांच्या खिलाडूवृत्तीसह कठोर परिश्रमाला मनापासून सलाम करतो, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी संघाचे अभिनंदन केले.



आपल्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले की, भारतीय महिला कबड्डी संघाने दाखवलेली जिद्द, तंत्र आणि संघभावना प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. संजू देवी आणि उपकर्णधार पुष्पा यांच्या निर्णायक चढायांमुळे अंतिम फेरीत भारताने आघाडी घेत विजयाला गवसणी घातली. प्रशिक्षक तेजस्विनी बाई यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने पुन्हा एकदा जागतिक कबड्डीवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

गेल्या महिनाभरात भारतीय महिलांनी साध्य केलेल्या तीन विश्वविजयांचा विशेष उल्लेख करत उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणतात की, देशातील महिला क्रीडा क्षेत्र अभूतपूर्व उंची गाठत आहे. सर्वप्रथम महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून आयसीसी महिला विश्वचषक जिंकला. त्यानंतर भारतीय अंध महिला क्रिकेट संघाने कोलंबोमध्ये झालेला पहिलाच अंध टी–२० विश्वचषक जिंकला आणि आता महिला कबड्डी विश्वचषकातही भारताने विजेतेपद पटकावले. फक्त महिनाभरात भारताच्या मुलींनी मिळवलेल्या या तीन विश्वविजयांनी संपूर्ण देशाची मान उंचावली आहे. भारतीय महिला क्रीडापटूंच्या कामगिरीचा हा सुवर्णकाळ सुरू झाला असून भारतीय महिलांचा विजयरथ कोणी रोखू शकत नाही. देशातील प्रत्येक मुलीसह खेळाडूंसाठी हा प्रेरणादायी क्षण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी भारतीय महिला कबड्डी संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी तसेच खेळाडूंच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले आहे.


पान १ वरुन

## पनवेलच्या धाकटा खांदा येथे ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

बाळकृष्ण म्हात्रे, भरत म्हात्रे, किशोर म्हात्रे, विनोद भगत, अतुल भगत, रोहित आठवणे, तुषार कापरे, गोवर्धन म्हात्रे, सुजित म्हात्रे, राकेश म्हात्रे, विकी तांबडे, नितेश म्हात्रे, मयूर म्हात्रे, विनायक म्हात्रे, हरेश म्हात्रे, रामभाऊ म्हात्रे, भास्कर भगत, मनोज पाटील, विशाल तांबडे, पंकज डोंगरे, रवींद्र डोंगरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## दुखवटा

### सुंदर अंबुर्ले



**माणगाव :** खरवली गावचे रहिवाशी प्रसाद उर्फ बाळू अंबुर्ले यांचे पिताश्री कै. सुंदर गोपाळ अंबुर्ले यांचे शनिवार दि. २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वा. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय – ८२ वर्ष होते त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले ,एक मुलगी,सून,जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दि.१ डिसेंबर रोजी तर उत्तरकार्य विधी बारावे बुधवार दि.३ डिसेंबर २०२५ रोजी राहते घरी खरवली ता. माणगाव येथे होणार आहे .

### निर्मला लाड



**कर्जत :** नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष शरद लाड यांच्या मातोश्री निर्मला लक्ष्मण लाड यांचे वार्धक्याने निधन झाले. निधन समयी त्या ९१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन पुत्र, सूना, दोन कन्या, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# चांगला अभ्यास करून आई-वडील आणि आपल्या गावाचे नाव मोठे करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे आणि आपल्या गावाचे नाव मोठे करावे, असे प्रतिपादन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी केवाळे येथे वह्या आणि गणवेश वाटपावेळी केले.



◆ भाजप नेते अरुणशेठ भगत यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमीत्त केवाळे येथील भाजपचे युवा नेते आणि उद्योजक योगेश माळी यांच्यावतीने वह्या आणि गणेश वाटपाचा कार्यक्रम मंगळवारी आयोजीत केला होता. केवाळे येथील एस.ई. एस माध्यमीक विद्यालयात हा वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला असून यावेळी अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना वह्या आणि गणवेशाचे वाटप करून त्यांना मार्गदर्शन केले.

दरम्यान, पंजाब येथे नुकत्याच पार पडलेल्या १६ व्या नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून प्रतिनिधीत्व करत उज्वल कामगिरी करून रजत पदक जिंकण्याचा मान केवाळे गावातील रोणाल महेश पाटील याने मिळवला असून त्याचा सत्कार या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, यतिन पाटील, माजी सरपंच शांताराम पोपेटा, विश्वास म्हात्रे, रमेश पाटील, नरेश पाटील, सुरेखा गायकर, नामदेव जमदाडे, प्रितेश डांगरकर, राजाराम माळी, गोटीराम गायकर, धनंजय म्हात्रे, उमेश वारदे, शिवराज माळी, दत्तात्रेय माळी, अनिल पालकर, केवाळे ग्रामपंचायतीचे सदस्य राजेश माळी, दत्तात्रेय माळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# तळोजा एमआयडीसीतील फाईब्रो कास्ट कंपनीला आग

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीमधील फाईब्रो कास्ट या कंपनीला सकाळी अचानक भीषण आग लागून मोठा आर्थिक नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या तीव्रतेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.



घटनेची माहिती मिळताच तळोजा एमआयडीसी अग्निशामक दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत अनेक फायर टँकर्सच्या सहाय्याने आग नियंत्रणात आणली. तसेच आगीतून पसरणारा धूर आणि ज्वाळा रोखण्यासाठी अतिरिक्त दलाची मदतही घेण्यात आली. अखेर शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र यंत्रसामग्री, तयार साहित्य व कच्चा माल जळून कंपनीचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत तळोजा पोलीस तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने स्वतंत्र तपास सुरू केला आहे.

विजेच्या शॉर्टसर्किटची शक्यता नाकारण्यात आलेली नाही. दरम्यान, तळोजा एमआयडीसी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्य आल्याने औद्योगिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# गुंतवणूक योजना सांगून ९५ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोस्टाच्या आणि इतर गुंतवणूक योजना सांगून ९५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी कामिनी पेडणेकर (रा. सेक्टर ६, साई सितारा बिल्डिंग, नवीन पनवेल) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २३ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

रुचिरा कौशिक या सेक्टर ६, नवीन पनवेल येथे राहत असून यांची कामिनी पेडणेकर यांच्याशी ओळख झाली. पेडणेकर यांनी त्या नवीन पनवेल येथील भारतीय पोस्टमध्ये एजंट म्हणून काम करत असल्याचे सांगितले आणि आरडी व एमआयएस स्कीम मध्ये पैसे गुंतवणुकीची माहिती दिली. त्यानुसार कामिनी पेडणेकर यांच्यामार्फत त्यांनी पंधरा लाख रुपये गुंतवले आणि आरडी स्कीम मध्ये दोन लाख आणि एक लाख गुंतवले. योजनेचे पासबुक हे पेडणेकर यांच्याकडे होते.

या वेळी दोन कोऱ्या विड्रॉल स्लीपवर कौशिक यांची सही घेतली होती. रक्कम काढून घेण्यासाठी कौशिक ह्या पेडणेकर यांना पोस्ट खात्यात जमा झालेल्या रकमेबाबत विचारणा करत होत्या. मात्र पेडणेकर या आजारी असल्याचे आणि कधी गावी असल्याचे कारण सांगत असत. जून २०२५ मध्ये त्यांचा एक्सीडेंट झाला असून ज्या बॅगेत पैसे आणि सोन्याचे कोईन होते ती बॅग चोरीला गेल्याचे पेडणेकर यांनी सांगितले आणि रक्कम सहा महिन्यात परत करते असे सांगितले. या वेळी पोस्ट खात्यात जमा असलेले पैसे चोरीला कसे गेले असतील असे कौशिक यांनी सांगितले असता ते दुसरे पैसे होते असे पेडणेकर यांनी सांगितले. या वेळी पेडणेकर यांच्यावर त्यांना संशय आला.

कौशिक यांनी पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन माहिती घेतली असता १५ लाख रुपये आणि आरडी स्कीममधील दोन लाख रुपये काढून घेतल्याने खाती बंद करण्यात आली असल्याची माहिती मिळाली, मात्र एक लाखांचे आरडी खाते नसल्याचे समजले तसेच पोस्टाच्या आरडी आणि एमआयएस खात्याला पेडणेकर यांचा मोबाईल नंबर असल्याचे समजले. फसवणूक झाल्याची खात्री झाल्यानंतर पेडणेकर यांच्या घरी गेल्या.

या वेळी तुमचे पैसे परत देतो असे सांगितले. या वेळी पाच लाखांचा धनादेश दिला. बँकेत जाऊन चौकशी केली असता तो धनादेश वटवला जाऊ नये असे पेडणेकर यांनी बँकेस कळवल्याने धनादेश वटला नाही. त्यानंतर दत्तात्रेय मिसाळ (रा. वारदोली) यांच्याकडून तीस लाख, लक्ष्मी भट यांच्याकडून साडेआठ लाख, आदिती मुरकर यांच्याकडून ३८ लाख ५० हजार रुपये घेऊन त्यांनादेखील पोस्टाच्या आणि इतर गुंतवणुकीच्या योजना सांगून फसवणूक केल्याचे समजून आले.

# पनवेलमध्ये रस्ते दुरूस्तीच्या कामाला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या चारही प्रभागतील रस्ते दुरुस्तीच्या कामांना वेग आला असून रस्ते दुरुस्तीच्या कामांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानूसार चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामांवर बांधकाम विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी कनिष्ठ अभियंता रात्रंदिवस रस्ते दुरूस्तीची कामे करत आहेत.





सध्या महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. खारघर येथील सेक्टर ३५डी मधील रस्ता दुरूस्ती काम सुरू आहे. याचबरोबर कामोठ्यामधील सेक्टर १० मधील रस्ते दुरूस्तीचे काम वेगाने सुरू आहे.

नवीन पनवेलमध्ये सेक्टर ४, सेक्टा १९, सेक्टर १मध्ये रस्ते दुरूस्ती जोमाने सुरू आहे. याचबरोबर कळंबोली मधील बालाजी स्कूल जवळील रस्त्याची कामे व सेक्टर १७ मधील रस्ते दुरूस्तीची कामे सुरू आहेत.

याचबरोबर नवीन पनवेलमधील डीमार्ट रस्त्याचे काम पूर्ण होत आले आहे.

# पनवेल वकील संघटनेची त्रैवार्षिक निवडणूक जाहीर

## ११ जागांसाठी २५ नामनिर्देशनपत्रे दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्यायालयीन कामकाजात वकील, अशील, कर्मचारी आणि न्यायालयात उद्भवणारे प्रश्न तसेच समस्या सोडवण्यासाठी काम करीत असलेली पनवेल वकील संघटना म्हणजेच पनवेल बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीच्या जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२८ या कालावधीसाठी त्रैवार्षिक निवडणूक जाहीर झाली आहे. शनिवारी २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीमधील वकील (बाररूम) दालनात मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी निकाल जाहीर करण्यात येईल.

निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सह सचिव (महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर, सहखजिनदार प्रत्येकी एक तर दोन महिला राखीव कार्यकारिणी सदस्य तसेच दोन सर्वसाधारण कार्यकारिणी सदस्य अशी एकूण अकरा पदाधिकाऱ्यांच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येणार आहे. संघटनेच्या नोंदणीकृत १५८५ वकील सभासदांच्या पैकी ११६३ मतदार उमेदवारांना मतदान करणार आहेत. निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जेष्ठ वकील ॲड. एच. जे. शेळके यांची मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून पनवेल बार असोसिएशनच्या वतीने नेमणूक करण्यात आली आहे. अकरा जागांसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीत २५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून यापैकी सात महिलांनी प्रतिनिधित्व सिद्ध करण्यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.

अध्यक्षपदासाठी ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ आणि ॲड. रत्नदीप राम पाटील, उपाध्यक्षपदासाठी ॲड. संतोष जोमा म्हात्रे तसेच ॲड. सचिन अंबाजी म्हात्रे, सचिवपदासाठी ॲड. प्रल्हाद घनश्याम खोपकर आणि ॲड. नित्यानंद राम ठाकूर, सहसचिव (महिला राखीव)पदासाठी ॲड. हेमा सिताराम भगत आणि ॲड. दिपाली रामदास गावंड, खजिनदार पदासाठी ॲड. धनराज कान्हा तोकडे आणि ॲड. महेबूब गैबी पटेल, सहखजिनदारपदासाठी ॲड. विशाल लक्ष्मण डोंगरे आणि ॲड. हेमंत गंगाधर शिंदे तसेच ॲड. रोहिदास हरी आगलावे, ऑडिटर पदासाठी ॲड. भूषण मोरेश्वर म्हात्रे आणि ॲड. भास्कर रामचंद्र पाटील कार्यकारिणी सदस्यपदासाठी ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे, ॲड. इर्शाद रमझान शेख, ॲड. आशिष विजय पनवेलकर, ॲड. जयसिंग जगन्नाथ शेरे, ॲड. नागेश अरविंद हिरवे तथा कार्यकारिणी सदस्य (महिला राखीव) पदासाठी ॲड. ज्योती पी. राऊत-उरणकर, ॲड. समीना साजिद खान, ॲड. दिपाली रवींद्र बोहरा, ॲड. छाया रामदास म्हात्रे, ॲड. आस्मिता नंदकिशोर भुवड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव (महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर या पदांसाठी प्रत्येही दोन उमेदवार असल्याने यांच्यात सरळ लढत होणार असून सहखजिनदारपदासाठी तिहेरी लढत होणार आहे. त्याचप्रमाणे दोन कार्यकारिणी सदस्य आणि दोन महिला राखीव कार्यकारिणी सदस्यपदांसाठी पाच पाच उमेदवार रिंगणात आहेत. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. शशिकांत म्हात्रे, ॲड. राजेश पाटील, ॲड. अरुण कुंभार काम पाहणार आहेत.

# उरण महाविद्यालयात सॅप आणि डिजिटल मार्केटिंगवर उद्‍बोधन वर्ग

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण महाविद्यालयातील वाणिज्य व अकाउंटिंग फायनान्स विभागाच्या वतीने महाविद्यालयात सॅप व डिजिटल मार्केटिंग या विषयावर उद्बोधन वर्गाचे आयोजन केले गेले. ग्लोबल आयओटी स्कूल, नवी मुंबई या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले गेले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या अभ्यास वर्गात अस्मा पटेल, आणि चार्टर अकाउंटंट पिंकी मॅडम व यश खैरे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, औद्योगिक रोजगारात सॅपची भूमिका व कार्य, डिजिटल मार्केटिंग इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. पी.आर. कारुळकर यांनी केला. पाहुण्यांचे स्वागत ज्येष्ठ प्रा.व्हि एस. इंदुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. आभार प्रा. रियाज पठाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आय,क्यु.ए.सी समन्वयक डॉ. अरुण चव्हाण, प्रा. विनिता तांडेल, प्रा. पुजा गुप्ता, प्रा. हन्नत शेख, प्रा. दिपु यादव यांनी मेहनत घेतली. या उद्बोधन वर्गात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.

# सीकेटी विद्यालयात संविधान दिनानिमित्त जागर फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात संविधान दिनानिमित्त जागर फेरी काढण्यात आली. यामध्ये कब - बुलबुल व तिसरी, चौथीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही जागर फेरी नवीन पनवेल परिसरात फिरवण्यात आला.

भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांना मिळालेली देणगी आहे. भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे लिखित स्वरूपाचे संविधान आहे. त्याचे महत्व विद्यार्थ्यांना व नागरिकांना कळावे हे या जागर फेरीचे उद्दिष्ट आहे.




माननीय मुख्याध्यापक सुभाष मानकर यांच्या हस्ते जागर फेरीचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी कब मास्टर प्रविण पाटील सर व फ्लॉक लीडर लता मोटे मॅडम तसेच देशमुख सर, धनवटे सर, मेंगाळ सर, प्रविण म्हात्रे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# प्लास्टिकबंदी जनजागृतीसह कापडी पिशव्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत रसायनी पाताळगंगा येथील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व प्रमोल केमिकल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने खैरणे एमआयडीसीत प्लास्टिकबंदी जनजागृती मोहीम राबवून दोन हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत दोन हजालर कापडी बॅग नागरिक व कामगार वर्गामध्ये वाटण्यात आल्या. प्लास्टिकचा वाढता वापर थांबविणे, पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आणि स्वच्छ पर्यावरण निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

प्रसोल केमिकल लिमिटेड व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट हे दोन्ही संस्थान पर्यावरण रक्षणासाठी सातत्याने कार्यरत असून समाजामध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजविण्यासाठी अशा उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रभागी असतात.

या कार्यक्रमास शोभा शेट्टी, मनोज काकड, अरुण गोविंद जाधव - अध्यक्ष, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, तसेच प्रसोल केमिकल लिमिटेडचा स्टाफ उपस्थित होता.

या मोहिमेद्वारे प्लास्टिकमुक्त परिसराकडे वाटचाल करत निसर्गरक्षणाचा उत्तम संदेश देण्यात आला. समाजाला पर्यावरणाबद्दल सजग करण्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरला.

# स्वरसाद संस्थेचा सहस्रनाद कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिजात संगीत जपण्यासाठी कार्यरत असलेल्या 'स्वरसाद फाऊंडेशन' या संस्थेचा वतीने 'सहस्रनाद' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध युवा गायक प्रथमेश लघाटे, अभिषेक काळे, मुग्धा गावकर आणि स्नेहल पाटील या गायकांनी अभंग आणि नाट्यगीतांचे सादरीकरण केले. त्यांना अनय घाटे यांनी संवादिनी, कौशिकी जोगळेकर यांनी कीबोर्ड, ओंकार काळे यांनी तबला, प्रवीण माने यांनी पखवाज आणि समीर कर्वे यांनी तालवाद्यांची साथ केली. निबंध कानिटकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



स्वरसाद फाउंडेशन ही संस्था अभिजात शास्त्रीय संगीत जपण्याकरता अविरत कार्य करत आहे.

तसेच संगीताचे कार्यक्रम करून मिळणाऱ्या निधीचा विनियोग आदिवासी मुलांच्या शिक्षणाकरता आणि पर्यावरण रक्षणासाठी केला जातो. आपले अभिजात संगीत खेडोपाडी व दुर्गम भागापर्यंत जावे यासाठी संस्था प्रयत्नशील आहे, अशी माहिती आयोजक किरण बापट यांनी दिली.

# पॉवरलिफ्टिर गणेश तोटेंना आर्थिक मदत

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून स्पर्धेसाठी सहकार्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वर्ल्ड टॉप ८मध्ये पॉवरलिफ्टिर असणाऱ्या पनवेल तालुक्यातील भिंगारी येथील गणेश संजय तोटे यांना महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आर्थिक मदत केली आहे.

आयपीएफ वर्ल्ड ओपन इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ रोमानिया येथे झाली. या स्पर्धेत १०५ कॅटेगिरी सिनिअरमध्ये गणेश तोटे यांनी पनवेल तक्का येथील फिटनेस ऑन जीमला रिप्रेझेंट करून सहभाग घेतला. आता ते पुढील इस्तामबुल तुर्की येथे होणार्या आशियाई मास्टर्स आणि ओपन क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये सहभाग घेणार आहेत.

या स्पर्धेसाठी लागणारा खर्च जास्त असल्याने व गणेश तोटे यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने त्यांना भाजप युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष हिमेश प्रभाकर बहिरा, माधव पंडित यांनी मार्गदर्शन केले. त्यानुसार तोटे यांनी परेश ठाकूर यांची भेट घेतली. त्यांनी लगेचच तोटे यांना आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

दरम्यान, पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडमध्येही गणेश तोटे हे सक्रीय असतात.



## संपादकीय

# रामराज्याची पुनर्स्थापना

शतकानुशतके झालेले घाव आता भरत आहेत. वेदनेला आता पूर्णविराम मिळतो आहे असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी अयोध्येतील श्रीराममंदिराच्या शिखरावर सनातन धर्मध्वजारोहण करताना काढले. प्रभू श्रीरामांचे हे भव्य मंदिर १४० कोटी भारतीयांची आस्था, सन्मान आणि आत्मगौरवाचे प्रतीक आहे. या मंदिरावर स्थापन झालेला हा धर्मध्वज म्हणजे केवळ ध्वज नसून तो भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे प्रतीक आहे.

**गेल्या वर्षी जानेवारी २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत अयोध्येतील श्रीराममंदिरात श्रीरामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्यानंतर आता मंगळवारी या मंदिराच्या बांधकामाच्या पूर्णत्वाचे प्रतीक म्हणून पंतप्रधान मोदी यांनी मंदिराच्या शिखरावर भगवा धर्मध्वज फडकवला. हिंदू धर्मात मंदिरावर ध्वज फडकावण्याची परंपरा अत्यंत प्राचीन व महत्त्वपूर्ण मानली जाते. शतकांपासून चालत आलेल्या स्वप्नाचे साकार स्वरूप म्हणजे हा ध्वज आहे. एका अर्थी अयोध्येत रामराज्याची पुनर्स्थापना झाली आहे असा संदेश या ध्वजारोहण सोहळ्याच्या माध्यमातून संपूर्ण जगाला दिला जाईल. या ध्वजारोहणाने अयोध्यानगरी भारताच्या सांस्कृतिक चेतनेचे प्रतीक बनली आहे. भारतासह संपूर्ण विश्व आता राममय झाले आहे. प्रत्येक रामभक्ताच्या हृदयात अद्वितीय संतोष आहे आणि असीम कृतज्ञता तसेच अपार आनंद आहे, अशा शब्दांत अवघ्या देशवासियांच्या भावनाच पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केल्या. या सोहळ्याने सांस्कृतिक उत्सवाचा आणि राष्ट्रीय एकतेचा नवा अध्याय सुरू होत आहे. उत्तर भारतीय नागर स्थापत्य शैलीत बांधलेल्या शिखरावर मंगळवारी हा धर्मध्वज फडकवण्यात आला. हा धर्मध्वज भारतीय सभ्यतेच्या पुनर्जागरणाचा ध्वज आहे. या ध्वजाचा भगवा रंग, त्यावर असलेला सूर्य, कोविदार वृक्ष हे सगळे रामराज्याची कीर्ती दाखवणारे आहे. हा ध्वज संकल्प आहे, यश आहे. संघर्षापासून सृजनाची गाथा म्हणजे हा ध्वज आहे. येत्या शतकांमध्ये आणि हजार वर्षांपर्यंत हा धर्मध्वज प्रभू श्रीरामाचे आदर्श आणि सिद्धांत यांचा जयजयकार करत राहील. हा धर्मध्वज 'सत्यमेव जयते'चे आवाहन करेल आणि तो प्रेरणाही होईल असे उद्गारही पंतप्रधानांनी यावेळी काढले. जे लोक काही कारणामुळे मंदिरात येऊ शकत नाहीत आणि दुरूनच मंदिराच्या ध्वजाला नमस्कार करतात, त्यांनाही तेवढेच पुण्य मिळते हे सांगणारा हा ध्वज आहे. श्रीरामलल्लाच्या जन्मभूमीचे दर्शन घडवणारा हा ध्वज आहे. प्रभू श्रीरामाच्या आदर्शांना अवघ्या जगापर्यंत पोहोचवणारा हा ध्वज आहे. या अविस्मरणीय क्षणाच्या आणि या सोहळ्याच्या मी जगभरातल्या कोट्यवधी रामभक्तांना शुभेच्छा देतो. ज्यांनी ज्यांनी राममंदिर निर्माणासाठी मदत केली, त्यांनाही मी प्रणाम करतो असेही मोदी यावेळी म्हणाले. हिंदू धर्मात मंदिरावर फडकवलेला ध्वज देवतेच्या उपस्थितीचे प्रतीक असतो आणि तो ज्या दिशेला लहरतो, तो संपूर्ण परिसर पवित्र मानला जातो असे 'गरुड पुराणा'त म्हटले आहे. 'वाल्मिकी रामायण' आणि 'रामचरितमानस' या दोन्ही ग्रंथांत ध्वज, पताका आणि तोरणांचा उल्लेख आढळतो. सनातन परंपरेत भगवा रंग हा त्याग, बलिदान, वीरता आणि भक्तीचे प्रतीक मानला जातो. ध्वजाला या परंपरेत विजय, धर्म, संरक्षण आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. धर्मध्वज मंदिराच्या शिखरावर स्थापन होणे म्हणजे मंदिर हे केवळ एक बांधकाम नसून जिवंत आध्यात्मिक केंद्र आहे. मंदिराचे निर्मितीकार्य पूर्ण झाले आहे हे दर्शविते.**

# विधी व्यवस्था, समाज व विकसित भारत २०४७

भारतीय संविधान निर्मितीस ७५ वर्ष पूर्ण होत असताना या अमृत महोत्सवी काळात भारतीय संविधाना प्रति आपण अधिक जागरूकता, संविधान जागर हे उद्दिष्ट ठेवून सर्वत्र राज्यघटनेवरील विश्वास अधिक दृढ व्हावा, जेणेकरून भारतीय संघराज्य अधिक मजबूत व राज्यघटनेच्या चौकटीत एकात्मतेची भावना विकसित होऊ शकेल या दृष्टीने वाटचाल करीत असतानाच भारतीय स्वातंत्र्याचा शतक महोत्सवाकडे जात असताना २०४७ पूर्वी भारतीय संघराज्य आत्मनिर्भर व सर्वार्थाने विकसित व्हावे हे उद्दिष्ट ठेवून विकसित भारत संकल्पना म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १०० वर्षांनी, म्हणजेच २०४७पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवण्याचे भारत सरकारचे ध्येय आहे. यामध्ये मजबूत अर्थव्यवस्था, प्रगत तंत्रज्ञान, सामाजिक विकास, शिक्षण, नागरी सुविधा, शुध्द पाणी, प्रदूषण नियंत्रण,आरोग्य सेवा व स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाणे अपेक्षित आहे. ज्यामुळे सर्व नागरिकांना उच्च जीवनमान आणि समान संधी मिळतील.

### विकसित भारत संकल्पनेची उद्दिष्ट्ये

आर्थिक विकास : देशाची अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे.

सामाजिक प्रगती : समाजातील प्रत्येक स्तरातील लोकांच्या जीवनात सुधारणा करणे आणि समानता आणणे. पर्यावरणीय शाश्वतता: पर्यावरणाचे रक्षण करून शाश्वत विकासाला चालना देणे.सुशासन: प्रशासकीय सुधारणा करून लोकांना अधिक चांगल्या सेवा उपलब्ध करून देणे.


पायाभूत सुविधा: रस्ते, वीज, पाणी इत्यादी पायाभूत सुविधांचे जाळे मजबूत करणे.

कौशल्य विकास: नागरिकांमध्ये कौशल्ये विकसित करून रोजगाराच्या संधी वाढवणे.

### विकसित भारत २०४७' मोहीम

ही संकल्पना केवळ एक ध्येय नसून एक 'पवित्र मिशन' आहे.या मोहिमेत तरुणांचा सहभाग महत्त्वाचा आहे, देशाच्या भविष्यासाठी विचार मांडण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेतून 'विकसित भारत' या ध्येयाकडे वाटचाल करणे हा या मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

आज भारतीय संविधान दिनानिमित्त आपण या दोन महत्त्वपूर्ण संकल्पनांचा एकत्रित विचार




करून वाटचाल केल्यास आगामी विकसित भारताचा पाया अधिक भक्कम होऊ शकेल या भावनेतून रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

### भारतीय कायदा निर्मितीवरील प्रभाव

भारतीय संसद हे कायदे बनवणारे सर्वोच्च मंडळ आहे. विधेयके संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर झाल्यानंतर आणि राष्ट्रपतींची संमती मिळाल्यावर कायदा बनतात.

### समकालीन आणि बदलणारे प्रभाव

सायबर गुन्हे, दहशतवाद आणि इतर गुन्ह्यांसारख्या नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कायद्यांमध्ये बदल केले जातात. कायदा आयोग कायद्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यामध्ये सुधारणा सुचवतो.

सार्वजनिक अभिप्राय आणि सूचना यांचाही कायद्याच्या मसुद्यांवर परिणाम होतो. ही प्रक्रिया असली तरी समकालीन विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी समाजामधून जेव्हा एखाद्या कायद्याच्या मसुदा , धोरणाबाबत प्रतिक्रिया मागवल्या जातात तेव्हाही सुजान नागरिकांनी याविषयी दक्ष राहून प्रभावी मत मांडणे उपयुक्त ठरेल.

कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा :-कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणजे अशी सरकारी संस्था जी कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असते, ज्यामध्ये पोलिस दल, तसेच विशिष्ट कायद्यांची अंमलबजावणी करणारी इतर अनेक सरकारी संस्थांचा समावेश होतो. या यंत्रणांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारी रोखणे, गुन्हेगारांना पकडणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि विशिष्ट कायद्यांची (उदा. आर्थिक कायदे, कामगार कायदे) अंमलबजावणी करणे यांसारख्या कामांचा समावेश असतो.

### विविध प्रकारच्या यंत्रणा

पोलिस दल : कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची प्राथमिक जबाबदारी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिसांची असते.

### विशेषीकृत संस्था

अंमलबजावणी संचालनालय: आर्थिक कायदे आणि आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित कायद्यांची अंमलबजावणी करते.

कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा तज्ज्ञसक्षम असणे फार आवश्यक आहे. अनेक ठिकाणी आपण पाहतो वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागा सुद्धा रिक्त आहेत. तसेच शासकीय यंत्रणेतील दप्तर दिरंगाई आणि भ्रष्टाचाराच्या बाबी नियंत्रणात आणण्याची इच्छाशक्ती प्रत्यक्ष व्यवहारात येऊन पारदर्शक यंत्रणा उभी राहणे हे आदर्श राज्याकरिता नितांत आवश्यक असेल.

सहभागी लोकशाही, विचारसरणी युक्त राजकीय पक्ष व सक्षम निवडणूक आयोग यांचा जवळचा संबंध आहे. भारतीय लोकशाहीचे वैभव नेहमीच मताधिकारक नव्हे तर त्या मताधिकाराला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या संस्थांवर जनतेच्या विश्वासात आहे. लोकशाही फक्त मतदानाच्या दिवशी जिवंत नसते तर ती प्रत्येक दिवशी , प्रत्येक व्यक्तीत पारदर्शकता, सत्यवादीता व संस्थांच्या नैतिकतेतून श्वास घेत असते. अशा प्रकारचा विश्वास जर कमी झाला तर नागरिकांनी संस्थांकडे संशयाने पाहायला सुरुवात केली तर नवल नाही. महत्त्वाचे म्हणजे जर सत्तेबद्दल प्रश्न विचारणे दुर्लक्षित केले किंवा दाबले गेले तर लोकशाहीचे अस्तित्व कागदावर राहते. हे सर्व टाळून प्रत्येकाने आत्मविश्वास व नैतिकतेने स्वतःच्या अधिकारात कर्तव्यपूर्ती वेळेत केली तर नागरिकांचा विश्वास बळावेल व त्यातून सहभागी लोकशाही विकसित होऊ शकते तसेच विकसित भारत सुद्धा.

आंतरराष्ट्रीय स्तरावर शस्त्र स्पर्धेच्या विरोधात व शांततेतून समस्यांची उकल करण्याच्या वातावरण निर्मितीचा आग्रह आवश्यक आहे. भारताचे परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताची प्रतिमा जरी चांगली असली तरी ती आत्ताच्या काळात पुरेशी नाही. जगाच्या वेगवेगळ्या खंडात वेगवेगळ्या देशात जो तणाव आहे व त्यातून शस्त्र स्पर्धेला निमंत्रण मिळते आणि कोणत्याही कारणावरून संघर्ष भेटत आहे. अशावेळी चर्चा व कुटनिती शिवाय पर्याय नाही. सहकार्य व सह अस्तित्व याच्या आग्रही भूमिकेतून आपण इतरांना स्वतः च्या आचरणातून दिशादर्शवू शकतो.

भारतीय न्याय पालिकेवरील वाढता तणाव : समाजातील संघर्ष वाढल्यानंतर पोलीस यंत्रणेवर ताण तणाव वाढतो, त्यापुढे जाऊन न्यायव्यवस्था कडे खटले वाढतात. परंतु न्यायाधीशांची संख्या आणि प्रलंबित केसेस हे सूत्र खूपच विषम असल्याने न्यायव्यवस्थेवरील तणावसुद्धा जाणवतो परिणामी वेळेत न्याय दुरापास्त आहे.

व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुनर्संचयित करण्यासाठी न्यायालयीन जबाबदारी आणि मोकळेपणाबद्दलच्या चिंता दूर करणेदेखील आवश्यक आहे. न्यायालयीन जबाबदारी प्रक्रिया वाढवून आणि नामांकन प्रक्रियेत पूर्णपणे सुधारणा करून व्यवस्थेची वैधता लक्षणीयरीत्या वाढवता येऊ शकते. कायदे सुधारून, गुंतागुंतीच्या बाबींसाठी विशेष न्यायालये उपलब्ध करून आणि न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया जलद करून विलंब कमी करणे आणि कार्यक्षमता वाढवणे शक्य आहे. भारत हमी देऊ शकतो की त्याचे न्यायपालिका लोकशाहीचा एक विश्वासार्ह पाया राहील, ज्यावर नागरिकांचा विश्वास असेल आणि जे या समस्या सोडवून जलद आणि न्याय्य न्याय देऊ शकेल.

स्वयंशिस्तीची वाढती आवश्यकता : मतभेदातून संघर्ष होऊ नये, झाल्यास त्याचे निवारण प्रस्थापित संहितेच्या आधारे व्हावे याकरिता नियमावली बनवली जाते. परंतु त्याचे पालन व्यवस्थित होत नसल्याने समाजात पोलीस यंत्रणेवरील व न्यायपालिकेवरील ताणतणाव वाढताना आपण पाहतो याचबरोबर कुटुंब व्यवस्था व समाज व्यवस्थेतील सौहार्दपूर्ण वातावरण सुद्धा बिघडत असते अशावेळी मूल्यांच्या आचरणातून स्वयंशिस्त प्रत्येकाने अंगीकारल्यास अनुशासित समाज निर्माण होऊन चिरकाल विकसित भारत शक्य आहे. या पार्श्वभूमीवर समाजातील सर्व घटकांमध्ये समाजभान विकसित होणे आवश्यक असते.

**-प्रा.डॉ. संदीप घोडके, नवी मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

# भारतात नवा स्मार्टफोन ब्रँडवॉबल वन लाँच

भारतीय टेक कंपनी इंडकल टेक्नॉलॉजीजच्या उप-ब्रँडने भारतीय बाजारात आपला पहिला स्मार्टफोन, वॉबल वन लाँच केला आहे. या फोनमध्ये ५०-मेगापिक्सेल एआय-चालित कॅमेरा, डॉल्बी व्हिजन सपोर्ट, मीडियाटेक डायमेन्सिटी ७४०० प्रोसेसर आणि स्लिम डिझाइन आहे.कंपनीने हा मिड-प्रीमियम फोन तीन स्टोरेज व्हेरिएंटमध्ये लाँच केला आहे. ८ जीबी रॅम आणि १२८ जीबी स्टोरेज असलेल्या बेस मॉडेलची सुरुवातीची किंमत २१,९९९ रुपये आहे. तथापि, ८ जीबी रॅम + २५६ जीबी स्टोरेज आणि १२ जीबी रॅम + २५६ जीबी स्टोरेज पर्यायांच्या किंमती जाहीर केलेल्या नाहीत. हा फोन १२ डिसेंबरपासून विक्रीसाठी उपलब्ध होईल. या फोनमध्ये प्रीमियम डिझाइनदेखील आहे. यात स्लिम ७.८ मिमी प्रोफाइल, ग्लास बॅक आणि ॲल्युमिनियम अलॉय फ्रेम आहे.



कॅमेरा : फोटोग्राफीसाठी, स्मार्टफोनमध्ये ५०-मेगापिक्सेलचा सोनी LYT-६०० प्रायमरी कॅमेरा आहे जो मागील बाजूस ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशन सह येतो. त्याच्यासोबत ८ मेगापिक्सेलचा अल्ट्रा-वाइड-अँगल लेन्स आणि बोकेह कॅमेरा आणि २ मेगापिक्सेलचा मॅक्रो लेन्स आहे.

विशेष म्हणजे, वॉबल वन त्याच्या कॅमेऱ्यात वॉबल मोड आणतो, ज्याला कंपनी एआय-स्टेबलाइज्ड फोटोग्राफी फीचर म्हणून वर्णन करते. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी यात ३२ एमपी उच्च-गुणवत्तेचा फ्रंट कॅमेरा देखील आहे.

डिस्प्ले : या स्मार्टफोनमध्ये १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटसह ६.६७-इंचाचा फुल एचडी+ एमोलेड पॅनेल आहे, जो सहज स्क्रोलिंग सुनिश्चित करतो. याची कमाल ब्राइटनेस १२००+ निट्स आहे आणि डॉल्बी व्हिजनला सपोर्ट करते.

पॉवर बॅकअप : कंपनीने अद्याप बॅटरी स्पेसिफिकेशनबद्दल कोणतीही माहिती शेअर केलेली नाही, परंतु कंपनीचा दावा आहे की हा फोन ४७ तासांपर्यंत कॉलिंग, २४ तासांपर्यंत व्हिडिओ प्लेबॅक आणि २२ दिवसांचा स्टँडबाय लाइफ देऊ शकतो.

इतर वैशिष्ट्ये : फोनमध्ये यूएसबी टाइप सी पोर्ट, ३.५ मिमी हेडफोन जॅक, डॉल्बी ॲटमॉस सपोर्ट आणि स्टायलिश एआय-पॉवर्ड इंटरफेस आहे.


# अभिमान आहे आम्हा संविधानाचा...

जगातील कोणत्याही देशापेक्षा सर्वात मोठे लिखित असे संविधान तयार करुन, केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगाला महत्वपूर्ण संविधानरुपी अनमोल असा ठेवा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. निश्चितच हे संविधान म्हणजे आपल्याला मिळालेले अलौकिक असे अनमोल, दिव्य रत्न आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपले भारतीय संविधान संमत झाले मात्र त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० रोजी सुरू झाली. यास ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत.

भारतीय संविधान हे इंग्रजी भाषेत असून हिंदी भाषेतील प्रतही कायदेशिरदृष्ट्या ग्राह्य आहे. जागतिक पातळीवर श्रेष्ठत्व असलेले आपले संविधान म्हणजे तमाम भारतीयांचा अभिमान आहे आणि म्हणूनच आपण अभिमान आम्हाला संविधानाचा... समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्वाचा'' असे अभिमानाने म्हणू शकतो.

भारताचे संविधान म्हणजेच भारतीय राज्यघटना. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते. आज जवळपास ६८ वर्षांपासून डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या या संविधानाच्या आधारे आपले भारतीय संघराज्य व व्यवस्था सुरळीतपणे चालू आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वांतत्र्य मिळाले आणि तद्नंतर म्हणजे २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान समिती स्थापन झाली. या समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, उपाध्यक्ष डॉ. एस. सी. मुखर्जी व सल्लागार म्हणून डॉ. बी. एन. राव यांची निवड करण्यात आली. या समितीत प्रामुख्याने पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राधाकृष्णनन, के. एम. मुन्शी व डॉ. जयकर यांचा समावेश होता. या समितीने संविधानाच मसुदा तयार करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना केली. या समितीने अखंड मेहनत घेऊन भारतीय संविधानाची निर्मिती केली.

या समितीने घटनेमध्ये आपल्या जन-गण-मन या गुरूवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या गीताला राष्ट्रगीताचा सन्मान दिला तसेच राष्ट्रध्वजाचीही निर्मिती करण्यात आली. घटनेच्या पहिल्या मसुद्यामध्ये ३१५ कलमे व ७ परिशिष्ट होती पुढे त्यात वाढ झाली. या संविधानाची उद्देशिका पुढीलप्रमाणे आहे. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम




## निमित्त

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता: निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन, आमच्या संविधान सभेस आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

यात नमूद केले आहे की आपला देश हा सार्वभौम (Sovereign), समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular) आणि प्रजासत्ताक (Republic) आहे. या उद्देशिकेच्या प्रत्येक शब्दातून आपणास संविधानाची महती लक्षात येते.

संविधानाची दिव्यता

भारताचे संविधान म्हणजे राज्यघटना संदर्भात विविध वैशिष्ट्ये आहेत. यात प्रामुख्याने संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र, नागरिकत्व, मूलभूत हक्क, समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुध्द हक्क, धर्मस्वातंत्र्यांचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, संविधानिक उपाययोजनेचा हक्क, विवक्षित कायद्यांचे व्यावृत्ती, त्याचप्रमाणे राज्य धोरणांची निदेशक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, संघराज्य, राज्य, त्याची कार्यपध्दती, न्यायालये, न्यायाधिकरणे, निवडणुका, आणीबाणी, राज्यभाषा या खेरिज संकीर्ण यात उर्वरीत सर्व विषय समाविष्ट होतात. अशा सर्व स्तरावरील बाबींचा समावेश आहे. भारतीयांना त्याच्या प्रत्येक स्वातंत्र्याचा अथवा जगण्याचा अधिकार, हक्क याचे स्पष्ट व सखोल मार्गदर्शन या घटनेत आहे. त्यामुळे ही घटना प्रत्येक भारतीयाला आपलीच वाटेल अशी आहे. राज्यकारभाराविषयीचे नियम, अधिकार, कर्तव्ये, लोकांचे सार्वभौमत्व आदी यात आहे. २६ जानेवारी १९५० पासून या घटनेनूसारच आपल्या भारत देशाचा राज्यकारभार सुरू झाला. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून एक राष्ट्रीय सण म्हणून साजरा करतो.

१७ डिसेंबर १९४६ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत केलेले या संदर्भातील त्यांचे पहिले भाषण अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अकस्मातपणे डॉ.बाबासाहेबांचे नाव भाषणासाठी पुकारले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी अमोघ असे भाषण केले. या भाषणाचे वर्णन करताना श्री. न. वि. गाडगीळ म्हणाले की, त्यांचे भाषण इतके मुत्सद्याला शोभणारे होते, इतके कटुतेशिवाय, इतके प्रामाणिक आवाहन करणारे होते की, संपूर्ण सभागृह मतिगुंग झाल्याप्रमाणे ऐकत होते. संविधान सभेमध्ये अशा प्रकारे पहिलेच भाषण प्रभावीपणे करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाची महती स्पष्ट केली. एकसंघ भारताच्या उन्नतीची धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीमागे होती. १० जून १९५० रोजी सिलोन दौऱ्यावरुन परत येतांना त्रिवेंद्रम येथे लेजिसलेटिव्ह चेंबरमध्ये त्यांनी एक भाषण केले. त्या भाषणात अत्यंत महत्वपूर्ण अशी गोष्ट स्पष्ट केली ती म्हणजे घटनात्मक नितीचे काटेकोरपणे पालन करा. यावेळी बोलताना ते म्हणाले, प्रत्यक्ष घटनेपेक्षा घटनेप्रमाणे वागण्याची नीती जनतेत असणे या गोष्टीला फार महत्व आहे. देशाला पार्लमेंटरी लोकशाहीची पध्दत यशस्वी व्हावयाची असेल तर सरकार व जनता या उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीती यांचे पालन करणे आवश्यक आहे. हे संकेत व नीती पुढीलप्रमाणे- सरकार बनविण्याच्या पध्दतीविषयी आदर, कायद्याचे पालन, स्वतंत्र विचार करण्याची सवय व बहुसंख्याकांच्या नियमाचे पालन

घटना समितीचे अध्यक्ष या नात्याने, भारतीय राज्यघटना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला देऊन जागतिक पातळीवर भारतीय सार्वभौमत्वाचे गौरवचिन्ह निर्माण केलेले आहे. केवळ संविधानच नव्हे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक क्षेत्रातील विचारही तेजस्वी, प्रखर व मौलिक असे आहेत.

**-डॉ. राजू पाटोदकर,**
मुख्य जनसंपर्क अधिकारी,
पनवेल महानगरपालिका

## आरोग्य प्रहर

# हे पाच ज्यूस प्या, वयाचा नाही लागणार पत्ता

लोक वेगवेगळ्या प्रकारचे ज्यूस पितात आणि या ज्यूस आरोग्याला अनेक फायदेही होतात. ज्यूसमुळे शरीरातील पोषक तत्वांची कमतरता भरून निघते. ज्यूस तुमच्यासाठी किती फायदेशीर आहे हे यावर अवलंबून असतं की, ज्यूस तयार करण्यासाठी कोणत्या भाज्या आणि फळांचा वापर करता.



नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नोलॉजी इंफॉर्मेशननुसार, काही भाज्या किंवा फळांच्या ज्यूसचं सेवन करणं खूप फायदेशीर असतं. ज्यूससाठी आम्ही हाय अँटी-ऑक्सिडेंट् आणि व्हिटॅमिन्सयुक्त फळ-भाज्यांची निवड केली पाहिजे. जेणेकरून आवश्यक पोषक तत्व मिळावेत.

### पत्ता कोबी ज्यूस

पत्ता कोबीची भाजी तुम्ही अनेकदा खात असाल. मात्र, याच्या ज्यूसमध्येही आरोग्यासाठी आवश्यक अनेक तत्व असतात. या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असतं, ज्याने इम्यून सिस्टीम मजबूत होतं आणि इन्फेक्शनसोबत लढण्यास मदत मिळते. यात एंथोसायनिन आणि फाइटोन्यूट्रिएंट्स नावाचे गुण असतात. या अँटी-ऑक्सिडेंट्सने शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव होतो. ज्यामुळे वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते.

### काकडीचा ज्यूस

व्हिटॅमिन के ची कमतरता भरून काढण्यासाठी काकडीच्या ज्यूसचं सेवन करणं फायदेशीर असतं. काकडीने शरीर डिटॉक्स होण्यासही मदत मिळते. काकडीच्या ज्यूसचं तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने सेवन करू शकता. जसे की, पुदीना आणि लिंबूचा रस मिक्स करून ज्यूस बनवणे.

### संत्र्याचा ज्यूस

संत्र्याच्या ज्यूसमध्ये भरपूर अँटी-ऑक्सिडेंट्स असतात जे शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव करतात. ज्यामुळे वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते. या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असतं, ज्यामुळे इम्यून सिस्टीम मजबूत होतं आणि इन्फेक्शनपासून बचावही होतो.

### द्राक्षाचा ज्यूस

द्राक्षाच्या ज्यूसमध्ये रिस्वेराट्रोलसारखे अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव होतो आणि वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते. या ज्यूने हृदयाचं आरोग्यदेखील चांगलं राहतं. ब्लड प्रेशर नियंत्रित राहतं आणि हृदयरोगांचा धोका टाळला जातो.

# रोहा पालिका निवडणुकीत शिवसेना, भाजप युतीचा आत्मविश्वास वाढला!

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषद निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असताना शिवसेना (शिंदे गट) – भाजप युतीने आपली राजकीय मोहीम आणखी तीव्र केली आहे. दोन्ही पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते एकसंधपणे प्रचाराच्या मैदानात उतरले असून विजयाचा सूर सुरूवातीलाच ठणकावला आहे. या पार्श्वभूमीवर युतीचे तालुकाप्रमुख मनोज कुमार शिंदे आणि भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी पत्रकारांशी संवाद साधत राजकीय चित्र स्पष्ट केले.



शिवसेनेचे तालुकाप्रमुख ॲड.मनोज कुमार शिंदे म्हणाले की, शिवसेना–भाजप ही नैसर्गिक युती आहे. वरिष्ठ नेतृत्वाने या युतीला दिलेला दुजेरा आमच्या कार्यकर्त्यांसाठी बळकट आधार आहे. रोहा बदलण्यासाठी आम्हाला फ्रीहँड दिला असून युतीचे कार्यकर्ते तन–मन–धनाने प्रचार करत आहेत. या शक्तीवर रोहा नगरपरिषद भवनावर भगवा झेंडा फडकेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे, असे शिंदे म्हणाले.

तर भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी युतीच्या यशाबाबत आत्मविश्वास व्यक्त करत म्हटले पूर्वीपासूनच शिवसेना–भाजप युती होती. आता वरिष्ठांनी या पारंपारिक युतीला अधिकृत बळ दिल्याने कार्यकर्त्यांचा जोश वाढला आहे. नागरिकही या युतीच्या बाजूने मतदानासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे युतीचा मुख्य उमेदवार तसेच सर्व दहा वॉर्डमधील उमेदवार निश्चित विजय मिळवतील.

यावेळी रोहा नगरपालिकेच्या उमेदवार शिल्पा अशोक धोत्रे, शिवसेनेचे ज्येष्ठ पदाधिकारी अशोक धोत्रे, शिवसेना शहराध्यक्ष मंगेश रावकर , भाजप शहराध्यक्ष व उमेदार सुमित रिसबूड , भाजप जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग युवा मोर्चा महिला तालुका अध्यक्षा रिया कासार , भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस व उमेदवार रोशन चाफेकर यांसह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. रोह्यातील राजकारणाला आता युतीच्या आक्रमक मोहीमेमुळे नवी दिशा मिळत आहे

## खोपोलीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग; दुकानदाराला अटक

**खोपोली : बातमीदार**

अल्पवयीन मुलीला दुकानात बोलावुन घेवुन तिचा विनयभंग करणा–या दुर्गा फ़रसाण मार्ट या किराणा मालाचे दुकानदारास अटक करण्यात आली आहे.

पिडित अल्पवयीन मुलगी लौजी खोपोली येथे राहणारी असून २० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडेसात वाजता तिचे मैत्रीणीचे घरून खेळुन घरी एकटी परत येत असताना आरोपी( रा.लौजी,खोपोली)याने ती अल्पवयीन असल्याचे माहित असताना देखिल तिला त्याचे दुर्गा फ़रसाण मार्ट या किराणा मालाचे दुकानात बोलावले. तिचा जबरदस्ती हात पकडुन जमिनीवर खाली बसवले. वाईट उद्देशाने तिचे बालमनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करत विनयभंग केला.

घाबरलेल्या मुलीने तिथून पळ काढत सदरची घटना तिच्या पालकांना सांगितली. पालकांनी खोपोली पोलीस ठाणे गाठत आरोपी विरुद्ध तक्रार दिल्यानंतर दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आला आहे.

अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण ह्या करीत आहेत.

## मुरूडच्या विद्यालयात एसएससी बॅचचा स्नेहमेळावा

### माजी विद्यार्थ्यांनी जागवल्या आठवणी



**मुरुड : प्रतिनिधी**

इयत्ता अकरावी एस एस सी जुन्या अभ्यासक्रमाच्या सन १९७५ च्या बॅचच्या सुमारे ५४ विद्यार्थ्यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षात शाळेत एकत्र येत साजर्या केलेल्या स्नेहमेळाव्याने आठवणींचा स्मृतीगंध मुरुडच्या सर एस एस हायस्कूलमध्ये पुन्हा एकदा दरवळला.

अकरावी शालांत परीक्षा जुनी एस एस सी अभ्यासक्रम सन १९७५ मुरुडच्या सर एस एस. हायस्कूलमधील बॅचच्या विद्यार्थ्यांनी शाळेचा निरोप घेतला त्याला चालू वर्षी पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रविवारी शाळेत सुवर्ण महोत्सवी सोहळा आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तथा सदर बॅचमधील एक विद्यार्थी उदय गद्रे होते.यावेळी जंजिरा विद्या मंडळाचे संचालक उदय दांडेकर,संचालिका सुशिला म्हात्रे ,माजी शिक्षक प्रकाश मसाल सर ,दिलीप दांडेकर सर , विद्यमान मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, सचिव उल्हास गुंजाळ,लेखनिक राहुल वर्तक आदी उपस्थित होते.

चंद्रशेखर सतविडकर , दिप्ती विभाकर दांडेकर,पांडुरंग आगरकर ,गणेश सुकाळे आदींनी शाळेतील जुन्या आठवणींना यावेळी उजाळा दिला. गेट टुगेदर या कार्यक्रमामुळे विद्यार्थीदशेतील आपले सर्व बालपणीचे मित्रमैत्रिणी पुन्हा एकत्र भेटतात. आपल्या शाळेच्या आठवणीत रमून जात असताना शाळेबद्दलची कतज्ञता व्यक्त करतात अशा कार्यक्रमांमुळे शाळेची विद्यमान स्थिती त्यांना ज्ञात होते व शाळेला मदतीचा हातभार देखील लागतो म्हणूनच ह्या संक़ल्पनेची ज्यांनी कुणी सुरुवात केली त्यांना सलाम करतो असे उद्गार संचालक उदय दांडेकर काढले.तर आमच्या शाळेचा शैक्षणिक क्षेत्रात आजही पूर्वीचा दबदबा कायम असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापक सरोज राणे यांनी सांगितले

शाळेबरोबरच मुरुड शहरातील आठवणींना उजाळा देतांना विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला.वयाने सद्या ज्येष्ठ नागरिक झालेले हे विद्यार्थी व माहेरवाशिणीविद्यार्थिनी या हृद्य कार्यक्रमात अक्षरशः हरखून गेल्या होत्या.

## निवडणुकीत आचारसंहितेचे योग्य पालन होईल –संजय दराडे

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात दहा नगरपंचायत, नगरपालिका निवडणुका पार पडत आहेत. येत्या दिनांक २ डिसेंबरला निवडणुका पार पडत असून दिनांक ३ तारखेला निकाल घोषित होणार आहेत. आदेश आचारसंहिता लागू असून निवडणूक कालावधीत आदेश आचारसंहितचे योग्य पालन केले जाईल, असे कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी आढावा दौऱ्यनिमित माणगाव येथील पत्रकारांशी संवाद साधला.



नगरपंचायत, नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी दिनांक २५ नोव्हेंबर रोजी आढावा दौऱ्यानिमित्त माणगाव शासकीय विश्रामगृह माणगाव येथे पत्रकारांशी संवाद साधला.

या वेळी ते म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील दहा नगरपंचायत, नगरपालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता सुरू आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत पोलीसांवर महत्वाची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने लागणारा बंदोबस्त व करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन आढावा दौरा करीत आहे.

संवेदनशील ठिकाणी तसेच आचारसंहिता लागू असणाऱ्या ठिकाणी पोलिसांची करडी नजर असून निवडणूक आचारसंहिता योग्य रीतीने पार पडेल. यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## पोलादपूरच्या नगराध्यक्षपदाचा स्नेहा मेहतांनी स्वीकारला कार्यभार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या नगराध्यक्ष पदाचे राजीनामे आणि नव्याने कार्यभार स्विकारण्याच्या संगीत खुर्चीचा खेळ सुरु असून दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर महिला आरक्षण नगराध्यक्ष पदासाठी तिसऱ्या नगरसेविका स्नेहा सचिन मेहता यांना शिवसेना पक्ष संघटनेच्या वतीने संधी देण्यात आली आहे. त्यांनी मंगळवारी नगराध्यक्ष पदाचा कार्यभार स्विकारला



शिवसेना पक्ष संघटनेच्या निर्णयानुसार शिल्पा देवेंद्र दरेकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त नगराध्यक्षपदासाठी स्नेहा सचिन मेहता यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलादपूर नगरपंचायत मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे निवडणूक कार्यक्रमानुसार दाखल करण्यात आले.

या नामनिर्देशन पत्राची छाननी पिठासन अधिकारी महाड उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे यांच्याकडून करण्यात आली. यानंतर नगराध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्याची औपचारिकता २५ नोव्हेंबरला होणार हे निवडणूक कार्यक्रमानुसार निश्चित झाले.

आज मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी सव्वा बारा वाजता पोलादपूर नगरपंचायत शिवसेना पक्षाचे गटनेते मनोज प्रजापती, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, नगरसेवक नागेश पवार, सिद्धेश शेठ, विनायक दीक्षित, निखिल कापडेकर, सोनाली गायकवाड, शिल्पा दरेकर, अस्मिता पवार, स्वीकृत नगरसेविका मृगया शहा आदी नगरसेवक नगरसेविका यांच्या उपस्थितीत स्नेहा मेहता यांनी नगराध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारला. अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## ‘पोस्को’च्या सामाजिक बांधिलकीतून आरोग्यसेवा; ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

ग्रामीण भागांमध्ये मोतीबिंदू सारख्या आजाराकडे दुर्लक्ष होत असताना, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने गेल्या काही वर्षांत समाजासाठी आशेचा किरण ठरलेला एक उपक्रम सातत्याने राबवला आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया मोहीम गेल्या काही वर्षांपासून कंपनीच्या आसपासच्या पाच ग्रामपंचायती (भागाड, विळे, वरचीवाडी, सणसवाडी, साजे) मध्ये राबवण्यात येत असून, या उपक्रमाद्वारे या भागातील नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष प्रकाश फुलवण्यात कंपनीला यश आले आहे.



या वर्षी घेतलेल्या मोतीबिंदू तपासणी शिबिरांना नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. तपासणीत मोतीबिंदू निदान झालेल्या एकूण ९० मोफत शस्त्रक्रिया कंपनीच्या सी.एस.आर. उपक्रमांतर्गत करण्यात आल्या आहेत. या ९० शस्त्रक्रियांमुळे अनेक जेष्ठ नागरिकांना पुन्हा स्वच्छ दृष्टी प्राप्त झाली आहे. मागील काही वर्षांचा विचार केल्यास, या उपक्रमाद्वारे एकूण ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य करण्यात आल्या आहे – आणि हा आकडा सामाजिक बांधिलकीचा आणि मानवी संवेदनशीलतेचा ठोस पुरावा ठरतो.

या संपूर्ण उपचार प्रक्रियेत रुग्णांची फक्त तपासणीच केली जात नाही, तर त्यांचा संपूर्ण प्रवास कंपनीकडून नियोजनबद्ध पार पाडला जातो. प्राथमिक तपासणी, हॉस्पिटलमध्ये ने–आण, तज्ज्ञ डॉक्टर्समार्फत शस्त्रक्रिया, औषधे, तसेच ऑपरेशननंतरची काळजी, चष्मा – या सर्व सुविधा पोस्को महाराष्ट्र स्टीलकडून पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेनंतर कंपनीचे अधिकारी स्वतः रुग्णांच्या घरी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची पाहणी करतात व चष्मा वाटप करतात. ग्रामीण भागातील नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानच या उपक्रमाचे खरे यश आहे. अनेक कुटुंबांना या सुविधेमुळे मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याचाही अनुभव सांगितला आहे.

आरोग्यासारख्या मूलभूत गरजांमध्ये हातभार लावून कंपनीने समाजाशी आपले नाते अधिक दृढ केले आहे. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, कोणाकडे पैशांच्या अभावामुळे उपचार थांबू नयेत आणि प्रत्येकाला स्वच्छ दृष्टीचा हक्क मिळावा याच विचारांनी हा उपक्रम पुढे नेला जात आहे.

कंपनीचा संकल्प स्पष्ट आहे – या उपक्रमातून पुढील काळात अधिक नागरिकांना मोफत उपचार उपलब्ध करून देणे, आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शक्य तितका प्रकाश पोहोचवणे. मोतीबिंदूमुळे दृष्टीतील कमतरता अनेकांना अपंग / अवलंबित्व आणते अश्या स्थितीत कंपनीने यासंदर्भात घेतलेले हे पाऊल अभिनंदनीय आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे

## राजिप तळवली शाळा परसबागेत सरस, तालुक्यातून द्वितीय क्रमांक

**खोपोली: प्रतिनिधी**

शालेय जीवनात पोषण आहाराला खूप महत्व असून या माध्यमातून प्रधान पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत या शाळेतील मूलांना सेंद्रिय खते द्वारे निर्माण झालेली परस बागेतील भाजी अनेकांचे लक्ष वेधून घेतले.ऑक्टोबर महिन्यात तालुकास्तरीय उत्कृष्ट परसबाग चे मूल्यांकन पोषण आहार अधीक्षक दीपा परब व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती खालापूर यांच्या माध्यमातून करण्यात आले.यावेळी खालापूर तालुक्यातील असलेली रायगड जिल्हा परिषद शाळा तळवली यांस द्वितीय क्रमांक देण्यांत आले.यामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत असल्याचे पहावयास मिळत आहे.



या ठिकाणी कडधान्ये समवेत फळे,पाले भाज्यांची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यांत आली होती.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असून. ज्यावेळी या शाळेचे परस बागेतील भाजीचे मूल्यांकन करण्यात आले यावेळी या शाळेला द्वितीय क्रमांक देण्यात आले.

शाळेचा परिसर मोठा असून ठराविक जागेमध्ये हा भाजीपाला लागवड करण्यात आले.यामुळे विद्यार्थ्यांच्या जेवणामध्ये सातत्याने फळ भाज्यांचा समावेश असल्याचे पहावयास मिळाले. त्यांना उत्तम व सकस आहार मिळावा यासाठी या भाज्यांची लागवड केली असल्याचे मत मुख्याध्यापक मस्तान बोरगे यांनी सांगीतले.या कामासाठी विशेष प्रयत्न तसेच सुरेश मांडे यांचे सहकार्याने लाभले तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

> **मुलांच्या मध्यान्ह भोजनात शालेय परसबागेतील ताज्या फळभाज्या यांचा समावेश असून पालेभाज्या वापर केल्यामुळे मुलांना संतुलित आहार मिळते. सदर ही पाले भाज्या मुलांच्या श्रमदानाचे मूल्य अंगात रूजविता यावी या विचारांतून हा उपक्रम हाती घेतल्यामुळे तालुक्यातून परस बाग ला द्वितीय क्रमांक देण्यात आला आहे**
>
> **मस्तान बोरगे, मुख्याध्यापक, तळवली**

## साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक येथे साकारणार ’लिव्हिंग लॅब’

**पोलादपूर : प्रतिनिधी**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्र आणि ’आयआयटी बॉम्बे’ यांच्या संयुक्त विद्यमाने साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगाव, जि. रायगड येथे ’प्रोजेक्ट आऊटरिच’ हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. पाणी, ऊर्जा इत्यादी मूलभूत क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान लक्ष केंद्रित असलेला हा पायलट–स्तरीय प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी क्रांतिकारी ठरणारी ’लिव्हिंग लॅब’ संकल्पना स्मारक परिसरात साकारण्यात येत आहे. प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे शाश्वत तंत्रज्ञानाचा प्रसार तथा प्रतिकृतिकरण आणि तंत्रज्ञानात सुधारणा करण्यासाठी संशोधन व प्रशिक्षणाला या प्रकल्पामुळे चालना मिळणार आहे

या प्रकल्पा अंतर्गत पहिल्या टप्प्यात मध्ये ४ किलोवॅट सोलर नेट मीटरिंग (ग्रिड–कनेक्टेड) प्रणाली, पाणी बचतीसाठी हँड वॉश स्टेशन, वीज न लागणारी गुरुत्वाकर्षण आधारित पिण्याच्या पाण्याची अल्ट्राफिल्ट्रेशन यंत्रणा तसेच वीज न लागणारा भाजी व फळे साठवण्यासाठी सब्जी कूलर स्मारक परिसरात बसविण्यात आले आहेत. या पहिल्या टप्प्याचे हस्तांतरण ’आयआयटी बॉम्बे’ कडून साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाकडे करण्यात येणार आहे.

हा हस्तांतरण समारंभ, येत्या गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, ता. माणगाव, जि. रायगड येथे आयोजित करण्यात येणार आहे. राजाराम देसाई, प्रकल्प प्रमुख, ’आयआयटी बॉम्बे’ (टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सोल्यूशन्स सेल आणि उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष) यांचे या प्रसंगी शाश्वत विकास, शाश्वत ऊर्जा व प्रगत तंत्रज्ञान यांची सांगड घालणाऱ्या या प्रकल्पाची संकल्पना व उद्दिष्ट या विषयावर सादरीकरण होईल. या समारंभाला महाविद्यालीन विद्यार्थी, प्राध्यापक, ग्रामीण विकासाच्या मुद्यावर काम करणारे कार्यकर्ते, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी उपस्थित राहणार आहेत. हस्तांतरण समारंभाला उपस्थित राहावे, हा प्रकल्प समजून घ्यावा व भविष्यात या प्रकल्पाचा उपयोग आपापल्या भागातील ग्रामीण विकासासाठी करावा असे आवाहन साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## किशोरी विकास प्रकल्पातर्फे योग, नेतृत्व आणि संस्कारांचा अनोखा संगम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महानगर गॅस लिमिटेड आणि सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच किशोरी विकास प्रकल्प – श्रीवर्धन विभागतर्फे आयोजित आठ दिवसांच्या विशेष उपक्रमाला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विभागाच्या समन्वयक अपर्णा प्रसाद बंदरकर व त्यांच्या परिश्रमी सहकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

या उपक्रमाला १५२ किशोरींनी उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवला. आभा योग’ संस्थेच्या योग शिक्षिका शुभांगी राजेंद्र धबडे यांनी योग, आरोग्यसाधना, योग्य आहार आणि भारतीय संस्कृती–संस्कार यांवर अतिशय प्रभावी मार्गदर्शन केले. किशोरींनी शांतपणे, लक्षपूर्वक विविध सूक्ष्म व्यायामप्रकार, श्वसनक्रिया आणि मनशांतीविषयी माहिती आत्मसात केली.

# वाशीमध्ये फेरीवाल्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका वाशी विभाग कार्यालयामार्फत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली.

वाशी विभाग अधिकारी सुखदेव एडवे यांच्या मार्गदर्शनाने अतिक्रमण पथकाने फेरीवाला मुक्त करण्यासाठी मागील काही दिवसांपासून धडक मोहिम सुरू केली आहे. वाशी सेक्टर-४ येथील प्रसिध्द जुहू चौपाटी हे ठिकाण संपूर्ण नवी मुंबईकरांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू आहे. शहरा बरोबरच बाहेरील नागरिक देखील दैनंदिन सकाळ आणि संध्याकाळी फिरण्यासाठी येतात. मुंबई व आजूबाजूच्या शहरातूनही मोठ्या प्रमाणात पर्यटक तेथे संध्याकाळचा आनंद घेण्याकरीता येणाऱ्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढतच आहे.



दरम्यान, याच ठिकाणी गर्दीचा फायदा घेत अनेक फेरीवाल्यांनी पदपथासह मोकळ्या जागांवर आपले बस्तान मानले होते. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना आणि बाहेरील पर्यटकांना चालणे कठीण होत होते. अनेकदा कारवाई करताना एक ते दोन फेरीवाले हाती लागत होते. नागरिकांकडून वारंवार होणार्या तक्रारीची दखल घेत वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या मार्गदर्शनानुसार एकाच वेळी सर्व बाजूने घेऊन सर्वच्या सर्व फेरीवाल्यांना हेरुन त्यांच्यावर धडक कारवाई करण्यात आली. येथील भेळपुरी, पाणीपुरी, सँडविच, इतर फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यात आली.

वाशी विभागात नागरिकांना त्रास होईल असे आणि विनापरवाना कोणतेही फेरीवाले निदर्शनास आल्यास त्यांच्यावर अतिक्रमण पथकाकडून कारवाई सुरुच ठेवण्यात येईल, असे सहाय्यक आयुक्त येडवे यांनी सांगितले.

# रोलिंग लाऊड कॉन्सर्टमध्ये चोरांची चांदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे दोन दिवसांच्या होणाऱ्या रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांची चांदी झाली आहे. या कार्यक्रमाचे महागडी प्रवेशिका शुल्क असूनही हजारोंच्या संख्येने खारघरमध्ये तरूणवर्ग आला होता. मोठ्या आवाजातील सांगितिक कार्यक्रमात चोरट्यांनी शिरून साडेदहा लाख रुपयांचे सोने चोरी केल्याच्या तक्रारी खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली.

शनिवार व रविवारी खारघर उपनगरातील सेक्टर ३१ येथे रोलिंग लाऊड इंडिया हिपहॉप म्युझिक फेस्टिव्हल साजरा झाला. पाच ते पन्नास हजार रुपये प्रवेशिका शुल्क असलेल्या या कार्यक्रमासाठी प्रेक्षकवर्ग सुद्धा त्याच उच्चभ्र घराण्यातील मुले व मुली होते. अखेरच्या क्षणात राज्य उत्पादन शुल्क विभागाची तात्पुरत्या स्वरूपात परवानगी मिळवून मद्यविक्रीचे स्टॉल येथे आयोजकांनी उभारले होते. हजारोंच्या संख्येने देशातील विविध शहरातून येथे तरूणवर्ग आला होता. कार्यक्रमातील कर्कश आवाज आणि तरूणांईचा जल्लोष यामध्ये चोरट्यांनी प्रेक्षकांच्या आभुषणावर डल्ला मारला.




खारघर पोलिसांकडे प्रेक्षकांनी दिलेल्या तक्रारीमध्ये रविवारी सायंकाळी ६ ते १० वाजण्याच्या दरम्यान सोन्याचे दागीने चोरण्याचे प्रकार घडले. मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने एकमेकांना खेटून असलेल्या प्रेक्षकांच्या गळ्यातून अक्षरशा सोनसाखळी खेचण्यात आल्या. अशा चार वेगवेगळ्या व्यक्तींच्या गळ्यातून १० लाख ५० हजार रूपये किमतीच्या सोनसाखळ्या चोरीस गेल्या आहेत. खारघर पोलीस चोरट्यांचा शोध घेत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी दिली.

या कार्यक्रमांत विझ खलिफा, डॉन टोलिव्हर (अमेरिका), सेंट्रल सी (यूके), तसेच करण औजला, दिव्य आणि हनुमानजाती (भारत) यांच्या सहभागाची घोषणा आयोजकांनी केली होती.

शनिवार व रविवार हे दोन दिवस सार्वजनिक सुट्टी असले तरी रात्रीच्यावेळी अभुतपूर्व कोंडी होती. वाहतूक पोलीस व खारघरचे स्थानिक पोलीस हीच कोंडीतून वाहतूक नियमनासाठी काम करताना दिसले. कार्यक्रमाची वेळ रात्री १० पर्यंतची असली तरी कार्यक्रमाच्या सूरक्षेचा ताण मध्यरात्रीपर्यंत पोलिसांना सहन करावा लागला. विशेष म्हणजे ज्या मैदानावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने रोलिंग लाऊड कॉन्सर्टसाठी तात्पुरती मद्यविक्रीची परवानगी दिली. त्याच मैदानात अनेक अध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रम यापूर्वी झाले आहेत. स्थानिक नागरिकांचा या ठिकाणी मद्यविक्रीच्या स्टॉलच्या तात्पुरत्या स्वरूपातील परवान्याला सुद्धा विरोध होता, परंतू विना वाद हा फेस्टिव्हल साजरा होण्यासाठी अखेरच्या क्षणाला मद्यविक्रीची परवानगी देण्यात आली.

# माथाडी कामगारांसाठी थेट बससेवा सुरू करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

घाणसोली, कोपरखैरणे, एपीएमसी, सानपाडा रेल्वे स्थानक या महत्त्वाच्या मार्गावर माथाडी कामगारांसाठी थेट बससेवा सुरू करावी, अशी मागणी परिवहन विभागाकडे कोपरखैरणे येथील माजी नगरसेविका सायली शिंदे यांनी परिवहन विभागाचे व्यवस्थापक योगेश कडूसकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. कडूसकर यांनी सकारात्मकता दर्शविली आहे.

नवी मुंबईतील कोपरखैरणे, घणसोली या पट्ट्यात माथाडी कामगार सर्वाधिक प्रमाणात वास्तव्यास आहेत. रोज सकाळ-संध्याकाळ एपीएमसी मार्केटमध्ये जाण्या येण्यासाठी त्यांना पुरेशी बससेवा उपलब्ध नसल्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या सुरू असलेली १० नंबर बस सेवा ही अनियमित आहे. त्यामुळे अनेकदा थकून भागून घरी जाण्यासाठी अधीर असणाऱ्या माथाडी कामगारांचा खोळंबा होऊन त्यांना मानसिक, शारीरिक त्रास होतो. हे कामगार बससेवेचा वापर सर्वाधिक करत असतात. सध्या बससेवा अपुरी असल्यामुळे अनेक कामगारांना रिक्षा, टॅक्सीने खर्चिक प्रवास करावा लागतो किंवा स्वतःची वाहने वापरावी लागत आहेत. कामगार दिवसभर कष्ट करत असतात; त्यात प्रवासाचा अनावश्यक त्रास आणि खर्च ही अन्यायकारक बाब असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे शासकीय परिवहन सेवा त्यांच्यासाठी उपलब्ध करून द्यावी.

जेणेकरून त्यांना परवडणारा प्रवास करता येईल. तसेच जे कामगारा नाईलाजास्तव स्वतःची वाहने आणतात, ती संख्या कमी होऊन होणारे ट्रॅफिक तसेच प्रदूषण कमी होईल. त्यामुळे घणसोली, कोपरखैरणे, एपीएमसी व सानपाडा रेल्वे स्थानक अशी बस सेवा खास माथाडींसाठी सुरू करावी, अशी मागणी शिंदेंनी पत्रात केली आहे.

# नोव्हेंबर महिन्यात ४६.५ किलो प्लास्टिक जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला होत असलेला धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा याकरिता नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दुकाने व व्यवसायाच्या ठिकाणी प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबवून तपासणी करण्यात येत आहे. तपासणीमध्ये प्लास्टिक पिशव्या अथवा एकल वापर प्लास्टिक वस्तू आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

या अंतर्गत ऑक्टोबर महिन्यात पाच दुकाने, आस्थापनांवर कारवाई करित २५ हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून ६.७०० किलो एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. या तपासणी मोहीमेंतर्गत नोव्हेंबर महिन्यातही २३ नोव्हेंबरपर्यंत २८ दुकाने, आस्थापना या ठिकाणी प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकचा उपयोग केला जात असल्याचे आढळल्याने एकूण एक लक्ष ४० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ४६ किलो ६०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.



यामध्ये परिमंडळ १ व परिमंडळ २ च्या भरारी पथकांनी विशेष कामगिरी केली असून प्रत्येकी ५ व्यावसायिकांवर कारवाई करीत प्रत्येकी २५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. तसेच परिमंडळ १ च्या भरारी पथकाने पाच किलो व परिमंडळ २ च्या भरारी पथकाने आठ किलो प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे.

ऐरोली विभाग कार्यालयातील प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथकानेही सहा व्यावसायिकांकडून ३० हजार रुपये दंडात्मक रक्कम वसूल केली आहे व आठ किलो २५० ग्रॅम प्लास्टिक साहित्य जप्त केले आहे. इतर विभागांमध्येही चांगली कामगिरी झाली आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ उपायुक्त संजय शिंदे यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालयाचे विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे अधिनस्त प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथके तसेच दोन्ही परिमंडळाची भरारी पथके प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवायांसाठी सतत कार्यरत आहेत.

प्लास्टिकमुळे मानवी जीवनाला व पर्यावरणाला पोहचणारा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी स्वत:हूनच प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णत: टाळावा व कापडी /कागदी पिशव्यांचा पर्याय निवडावा तसेच व्यावसायिकांनीही आपल्या वस्तू देण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देऊ नयेत व प्लास्टिक पिशव्या दुकानात ठेवूच नयेत असे आवाहन नवी मुंबई पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



# रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

श्रीमदपुरुषार्थ ग्रंथामध्ये सांगितल्याप्रमाणे रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. कारण परमात्म्याला आवडणाऱ्या नऊ थेंबापैकी एक थेंब म्हणजेच रक्ताचा थेंब आहे. ह्या दानामुळे परमात्म्याची कृपा प्राप्त होते व पुण्यसंचयही होतो.

या विचारनुसार श्री अनिरुद्ध उपासना फाउंडेशन व दिलासा मेडिकल ट्रस्ट व सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण मुळेखंडतर्फे उरण नगर पालिका शाळा नंबर १ उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या रक्तदान शिबिरात एकूण १७६ रक्तदात्यांनी भाग घेतला त्यामध्ये २३ रक्तदाते काही कारणास्तव रिजेक्ट करण्यात आले. जे रक्तदाते आले होते त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करून आभार मानण्यात आले. एकंदरीत १५३ जणांनी रक्तदान केले.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धा




**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात शनिवारी (दि.२२) विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

रामशेठ ठाकूर साहेबांच्या ७५ व्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन संस्थेच्या अनेक शाखांमध्ये करण्यात आले. या दिनाचे औचित्य साधत संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती.भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात रोल प्ले, स्टॅचू ड्रेस अप, एकपात्री नृत्य, वेशभूषा अश्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वेशभूषा स्पर्धेचे खास आकर्षण पाहायला मिळाले त्यात अनेक चिमुकल्यांचा सहभाग असून काहींनी भगतसिंग, राजगुरू, इंदिरा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज झाशीची राणी तसेच खास आकर्षण तर काही चिमुकल्याणी हुबेहूब लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचीदेखील वेशभूषा करत सर्वांचे लक्ष वेधले. तसेच स्टॅचू ड्रेस अपसाठीदेखील लोहपुरुष सरदार वल्लबभाई पटेल, विश्र् रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतमाता, कालिका देवी तसेच अनेकांची प्रतिमा हुबेहूब साकारली काहींनी आपले मदतनिस सफाई कर्मचारी, पोलीस, डॉक्टर, नर्स आदींची भूमिका बजावत सामाजिक संदेश दिले. यात शंभर हुन अधिक स्पर्धेकांनी सहभाग नोंदवत स्पर्धेची शोभा वाढवली.

या विशेषवेळी ज.भ.शि.प्र.संस्थेचे बोर्ड ऑफ कमिटी मेंबर वर्षा ठाकूर, अ‍ॅड. राहुल घरत, सुरेश पाटील, सुनील पाटील, मेघनाथ तांडेल, सीमा घरत तसेच सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. या संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी रवींद्र म्हात्रे, श्रीश म्हात्रे परीक्षक म्हणून उपस्थित होते. या वेळी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वैदर्भियांचा २९ नोव्हेंबर रोजी खारघरमध्ये स्नेहमिलन सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

नोकरी, व्यवसायानिमित्त आपापल्या गावांपासून शेकडो किलोमीटर दूर आलेल्या मुंबई आणि नवी मुंबईतील विदर्भवासीयांचा यांचा खारघर येथे चौथा स्नेहमिलन सोहळा 'आपला विदर्भ सामाजिक-सांस्कृतिक संस्था'तर्फे आयोजित करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर १२ येथे उत्कर्ष हॉल येथे २९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ ते रात्री १० दरम्यान सदर स्नेहमिलन सोहळा पार पडणार आहे. चंद्रपूर, गडचिरोली ते बुलढाणा पर्यंत पसरलेल्या विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील हजारो वैदर्भीय नवी मुंबई आणि मुंबईत राहत आहेत, मात्र त्यांची प्रभावी संघटना नसल्याने वैदर्भियांचे सांस्कृतिक आणि इतर कार्यक्रम या परिसरात पार पडत नाही. त्यामुळे आपल्या गावांपासून खूप दूर आलेल्या मराठी माणसांना आपली बोली भाषा, आपल्या खाद्य आणि जीवनशैलींवर आधारित समारंभांची उणीव सतत भासत असते. उणीव दूर करण्यासाठी या परिसरातील वैदर्भियांनी एकत्र येऊन 'आपला विदर्भ' संघटना तीन वर्षांपूर्वी स्थापन केली आहे.

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी, क्रीडापटू, आपली नोकरी आणि व्यवसायात कर्तुत्व गाजविलेल्या व्यक्तींचाही सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नृत्य, गायन आदी कलाप्रकार सादरीकरणाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा परिचय करून देता यावा, यासाठी एक विशेष परिचय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भातील लोकप्रिय सावजी भोजनाचीही खास व्यवस्था या वेळी करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने वैदर्भियांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन 'आपला विदर्भ संस्था'चे अध्यक्ष अ‍ॅड. विजयकुमार कोहाड आणि सरचिटणीस प्रमोद चुंचूवार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कोहाड (९९६९२३८१५०) आणि सचिव-राजेंद्र नंदनकर (९९६७२२३८९०) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन 'संस्था'तर्फे करण्यात आले आहे.

# एनएमएमटी बस क्र. २०च्या फेऱ्या वाढवण्याची गरज

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबई मनपा परिवहन सेवा बस क्रमांक २० बस फेऱ्यात वाढ करावी आणि प्रवाशांना जलद आणि उत्तम सेवा द्यावी अशी मागणी भाजपा नवी मुंबई माजी युवक अध्यक्ष दत्ता घंगाळे यांनी नवी मुंबई परिवहन प्रशासना कडे केली आहे.

नवी मुंबई परिवहन विभागाकडून घणसोली डेपो वरुन सिवूड्स अशी बस क्रमांक २० आहे. ही २० क्रमांक बस घणसोली कॉलनी घणसोली रेल्वे स्टेशन, कोपरखैरणे कॉलनी आणि रेल्वे स्टेशन, वाशी, तुर्भे, तुर्भे नाका, एल पी नेरुळ मार्गे सिवूड्स अशी सेवा प्रवाशांना देत आहेत, एक एक तास प्रवाशांना या बसची प्रतीक्षा करावी लागते. शालेय विद्यार्थी, विशेषतः महिलांना अर्धी तिकीट असल्याने बेस्ट पेक्षा या बस मध्ये महिलांची संख्या अधिक असल्याने या बस साठी मोठी गर्दी असते.

दैनंदिन फेऱ्या अल्प असल्याने प्रवाशांना या बसची वाट पहात बस स्थानकात बसावे लागत असल्याने प्रवासांचे प्रचंड हाल होत आहेत. या मार्गावरील बस संख्या व फेऱ्या सुरळीत करण्यात याव्या किंबहुना वाढवण्यात याव्यात, अशी मागणी दत्ता घंगाळे यांनी केली आहे.

# मोहोपाड्यात आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ब्रम्हलिन हभप गुरुवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाआशिर्वादाने वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा आयोजित श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सुवर्ण जन्मोत्सव तपपुर्ती सोहळानिमित्त श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह मोहोपाडा येथील जनता विद्यालय मैदानावर बुधवार दि.२६ पासून सुरू होत आहे.

या सप्ताहात प्रवचन, हरिपाठ, तसेच सायंकाळी ७ ते ९ वाजता सुप्रसिध्द महाराजांची किर्तंने होणार आहेत. बुधवार दि.३ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ वाजता हभप राम महाराज सोलापूरकर (जोग महाराज) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सप्ताहासाठी वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा, खालापूर व पनवेल तालुका अथक परिश्रम घेत आहे.

# भाजपच्या आशा शिंदेंनी घेतली आमदार मंदा म्हात्रे यांची भेट



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आगामी नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सीबीडी येथील भाजपच्या आशा शिंदे यांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांची गौरव निवासस्थानी रविवारी (दि.२३) भेट घेत संवाद साधला.

या भेटीत स्थानिक पातळीवरील प्रश्न, आगामी निवडणूक धोरण, मतदारांपर्यंत संपर्क वाढविणे तसेच केलेली विकासकामे याबाबत आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत आशा शिंदे यांनी संवाद साधत चर्चा केली.

उच्छुक स्थानिक उमेदवारांनी केलेली जनतेची कामे, मतदारसंघातील समस्या सोडवण्याची हातोटी, जनसंपर्क आणि त्यांचे पक्षासंबंधित असलेली एकनिष्ठा पाहूनच पक्षनेतृत्व वरिष्ठ पातळीवरून उमेदवार ठरवेल, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.

या वेळी भाजप महामंत्री नवी मुंबई जिल्हा निलेश म्हात्रे, सुरेश कोरे, शशिकांत गायकवाड, सुजित शिंदे, दीपक पाजगे, जगन पारवे, शिवाजी कोरे, जयराम पासवान, अमोल शिंदे, अजय तांबे, रेश्मा बनकर, लता पारवे, विमल दैणे, महादेवी गायकवाड, आशा बोरकर, तसेच रमाबाई आंबेडकर नगर येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणगावमध्ये सतत वाहतूक कोंडी

## नागरिक त्रस्त; दररोज हाणामारीचे प्रकार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराची शांतता, शिस्त व सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन आज वाहतूक कोंडीमुळे पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर रोज सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड वाहनांची रांग लागलेली दिसते. कोंडी इतकी तीव्र झाली आहे की काही ठिकाणी तर प्रवाशांत तोंडी वाद, धक्काबुक्की आणि हाणामारीचे प्रकारही घडताना दिसत आहेत. परिणामी नागरिक, महिला, विद्यार्थी आणि रोजंदारीवर जाणारे कामगार मोठ्या संकटात सापडले आहेत.

मुंबई–गोवा महामार्गाची अपूर्णता समस्येला मुख्य कारण आहे. शहरातून जाणारा मुंबई–गोवा महामार्ग अद्याप पूर्ण न झाल्यामुळे महामार्गावरील वाहतूक संपूर्ण शहरातच अडकून पडते. अरुंद रस्ता, उभ्या असलेल्या गाड्या आणि सततचा जड वाहनांचा ताण यामुळे छोटे–मोठे अपघात तर रोजचेच झाले आहेत. त्यातच वाहतूक वळवताना संपूर्ण शहर जाम होते. मोरबा रोड, कचेरी रोड, निजामपूर चौक हे शहरातील 'हॉटस्पॉट' ठरत आहेत. मोरबा रोड, कचेरी रोड आणि निजामपूर चौक या भागांमध्ये वाहतूक कोंडीचे प्रमाण दररोज भीषण असते. रिक्षांची गर्दी, बसचा ताण, चारचाकी–दुचाकींची स्पर्धा आणि चौकातील अपुरे नागरिक नियोजन यामुळे नागरिकांना पंधरा मिनिटांचा प्रवासही अवघड होतो. पोलिस यंत्रणेवर मोठा ताण पडत आहे.



### प्रशासनाकडे उपाययोजनेची मागणी

***माणगाव शहराचा दैनंदिन श्वास गुदमरत चालला आहे. वाहतूक कोंडीचे सर्पिल जाळे वाढत चालले असून, प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.***

वाहतूक पोलीस कर्मचारी अत्यंत कमी असल्याने परिस्थिती हाताळताना त्यांच्यावर प्रचंड ताण येत आहे. एका कर्मचाऱ्याला दोन ते तीन चौकांवर लक्ष ठेवावे लागत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवणे अशक्यप्राय होते. या कारणामुळे अपघात झाल्यावर किंवा वाद झाल्यास तात्काळ नियंत्रण करणेही कठीण जाते. अचानक हाणामारीचे प्रकार नागरिक भयभीत झाले आहेत. गर्दीत अडकलेली वाहने, पुढे जाण्याची घाई, समोरच्याचे ऐकू न घेणे या सगळ्याचा परिणाम म्हणजे काही ठिकाणी धक्काबुक्की, तोंडी वाद आणि हाणामारीचे प्रसंग घडत आहेत.

या घटनांमुळे महिला व ज्येष्ठ नागरिक अधिकच घाबरले असून, सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी त्वरित उपाययोजना आवश्यक नागरिकांचा आग्रह आहे. शहरातील नागरिक व व्यावसायिकांनी प्रशासनाकडे खालील मागण्या जोरदारपणे मांडल्या आहेत. वाहतूक पोलिसांचा तातडीने बंदोबस्त वाढवावा. महामार्गाचे अपूर्ण काम जलदगतीने पूर्ण करावे. चौकांमध्ये सिग्नल व्यवस्था व सीसीटीव्ही बसवावे. अतिक्रमण हटवून रस्ते रुंद करावेत. मोरबा रोड, कचेरी रोड व निजामपूर चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करावे.

# श्रीवर्धनमध्ये अनधिकृत बॉक्साईड उत्खनन तेजीत

◆ प्रादेशिक परिवहन विभागाने लक्ष देण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

यावर्षी लांबलेला पावसाळा संपल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा अनधिकृत बॉक्साइड उत्खनन तेजीत सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. बॉक्साइड उत्खनन करून अनेक व्यक्ती आपला उत्कर्ष साधत आहेत, परंतु यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनधिकृत उत्खनन अशाच प्रकारे सुरू राहिल्यास केरळमधील वायनाडच्या घटनेची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. बॉक्साइड उत्खनन करताना शासनाकडून अनेक नियम व अटी घालुन दिलेल्या असतात.

बॉक्साईटचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांकडून यापैकी कोणत्याही गोष्टीचे पालन केले जात नाही. ज्या ठिकाणी जमिनीमध्ये खोलवर ड्रिल मारून बॉक्साईड साठी ब्लास्ट घडविला जातो. त्या ठिकाणी बॉक्साइड काढून झाल्यानंतर पुन्हा माती भराव करून त्यावरती वृक्ष लागवड करणे बंधनकारक आहे, परंतु आजपर्यंत श्रीवर्धन तालुक्यात हजारो टन बॉक्साइडचे उत्खनन होऊनसुद्धा कुठल्याही कंपनीने पर्यावरणाशी आपली बांधिलकी जपलेली पाहायला मिळत नाही.

बॉक्साइडचे उत्खनन करण्यासाठी जे ब्लास्ट केले जातात, त्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुरक्षा सुविधा राबविली जात नाही. उत्खननासाठी ड्रिल केलेल्या बोगद्यात पावसाचे पाणी साठून श्रीवर्धन तालुक्यातदेखील आगामी काळात मोठे भूस्खलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



बॉक्साइडची अवजड वाहतूक क्षमतेपेक्षा जास्त घेऊन जाणारे मालवाहू ट्रक, गाडी भरलेली असताना अत्यंत कमी वेगाने घाट चढत असतात, परंतु रिकामी करून आल्यानंतर सदरच्या गाड्या अतिशय वेगाने येत असल्यामुळे अनेक वेळा अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईड भरलेल्या गाड्यांचे अनेक वेळा अपघात होऊन त्यामध्ये चालकांना आपले प्राणदेखील गमवावे लागले आहेत, मात्र या बॉक्साइडच्या अवजड वाहतुकीवर प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांच्याकडूनही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. कारण बॉक्साइडची वाहतूक करणाऱ्या माफी यांनी या सर्व यंत्रणांना आर्थिक तडजोडीमध्ये गुंतवून ठेवल्यामुळे अवजड वाहतुकीचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे.

### पर्यावरणाचा होतोय ऱ्हास

***राज्य शासन तसेच वरिष्ठ स्तरावतील प्रशासनाने या अनधिकृत उत्खनाबाबत तातडीने कारवाई करून या ठिकाणच्या वनसंपत्तीचा व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता घेण्याची मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.***

श्रीवर्धन तालुक्यातील मेघरे, सायगाव, कुरवडे, खुजारे या गावांच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावरती बॉक्साइड उत्खनन झालेले आहे व यापुढेही केले जाणार आहे. श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटनासाठी पर्यटकांच्या पसंतीचे क्रमांक एकचे ठिकाण आहे, परंतु या ठिकाणाहून अशाच प्रकारे बॉक्साइड वाहतूक होत राहिली तर या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य धोक्यात येईल व या ठिकाणी होणाऱ्या पर्यटन व्यवसायावर त्याचा गंभीर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

# नेरळमध्ये पूर्ववैमनस्यातून एकावर जीवघेणा हल्ला

**नेरळ : प्रतिनिधी**

रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नेरळ पेशवाई मार्गावर घडलेल्या बंदुकीच्या आवाजाने नेरळ परिसर हादरून गेला. येथील राहत असलेल्या सचिन अशोक भवर (रा. श्री स्वामी समर्थ संकुल) यांच्यावर मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी सलग दोन गोळ्या झाडत त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने पहिली गोळी हुकली तर दुसरी गोळी उजव्या कंबरेजवळून घासून गेल्याने भवर थोडक्यात बचावले. दरम्यान जखमी अवस्थेत भवर नेरळ पोलीस ठाण्यात पोचल्याने खळबळजनक घटना समोर आली.

सोमवार, २४ नोव्हेंबर रोजी भवर हे अंबरनाथहून मित्रासोबत मोटरसायकलवरून नेरळकडे येत होते. शेलू येथे मित्राला उतरवल्यानंतर ते एकटेच पेशवाई रोडने घरी मोटरसायकलवर जात असताना दोन अज्ञात व्यक्ती मोटरसायकलवरून त्यांचा पाठलाग करत होते.

पुलाजवळ अंधाराचा फायदा घेत आरोपींनी भवर यांची गाडी अडवली. मागच्या सीटवर बसलेल्या व्यक्तीने पहिली गोळी झाडली, ती चुकली. त्यानंतर लगेचच दुसरी गोळी झाडली जी भवर यांच्या कंबरेजवळून लागून गेली. या वेळी आरोपी फरार झाले तर जखमी भवर तत्काळ नेरळ पोलीस ठाण्यात पोहचले.

जखमींना पाहताच नेरळ पोलीस ठाण्याचे



पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी भवर यांना तत्काळ नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून उपचार सुरू केले. त्याचसोबत ढवळे यांनी आपल्या पोलिस टीम सह सीसीटीव्ही तपासणी सुरू केली असता धक्कादायक माहिती मिळाली – गोळीबार करणाऱ्या आरोपींपैकी एकाचा भवर यांच्याशी पूर्वीचा वाद होता.

आरोपीचे नाव अविनाश जगनाथ मारके (वय ४५) असे असून तो भवर राहत असलेल्या स्वामी समर्थ चाळीत काही वर्षांपूर्वी फॅमिली सोबत राहत होता. तपासात पुढे आले की मारके हा धुळे शहरात १५ गुन्ह्यांमध्ये वाँटेड असून सराईत गुन्हेगार आहे.

दुसऱ्या आरोपीची ओळख अद्याप पटलेली नाही. तीन वर्षांपूर्वी चाळीत राहायला आलेल्या आरोपी मारके यांचा काही महिन्यापूर्वी पाण्याच्या वादातून स्थानिक रहिवाशांमध्ये भांडण झाले होते. त्या भांडणानंतर आरोपी घर सोडून गेला होता. भवर यांच्या मते याच वैमनस्यातून हा जीवघेणा हल्ला झाला असावा.

### नेरळ पोलिसांची पथके आरोपीच्या शोधात

**घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रात्री उशिरा गुन्हा दाखल करून तीन विशेष पथकं आरोपींचा शोध घेण्यासाठी नेमली आहेत. ढवळे, पोलीस उपनिरीक्षक भास्कर गच्चे आणि पोलीस टीम सीसीटीव्ही फुटेज, जुन्या तक्रारी आणि सूत्राकडून माहितीचा आधार घेत तपास करत आहेत. नेरळ पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी सांगितले की, गोळीबार अत्यंत गंभीर आहे. आरोपींपैकी एकाची ओळख पटली असून त्याला पकडण्यासाठी पोलिसांची तीन पथके रात्रंदिवस शोध घेत आहेत.**

# कोयना मराठा समाजातर्फे कीर्तन महोत्सव; अनेकांचा सहभाग

**चौक : प्रतिनिधी**

कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघ(रजि.) रायगड, ठाणे व पालघर यांच्या वतीने तीन दिवसाचा भव्य किर्तन महोत्सव खालापूर तालुक्यातील कुसावडे (वडवळ) येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

महाकैवल्य तेजोनिधी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७५० व्या जन्मोत्सव सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व जगतगुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या त्रिशतकोत्तर ३७५ व्या वैकुंठगमन अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघाचे अध्यक्ष तुळशीराम काशिराम सावंत, कार्याध्यक्ष श्रीरंग भातोसे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज शेलार व ह.भ.प.श्रीरंग महाराज साळुंखे यांच्या मार्गदर्शनाने तीन दिवसीय भव्य किर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

समाजातील थोर महात्मे किर्तनकार, प्रवचनकार व वारकरी संप्रदाय यांच्या अध्यात्मिक ज्ञानात भर पडावी, कोयना मराठा समाज एक संघ, एकरूप रहावा, समाजातील तरुण, तरुणी कीर्तनकार यांना मार्गदर्शन व्हावे असा उद्देश या किर्तन महोत्सवात होता, असे समाजाचे अध्यक्ष तुळशीराम सावंत यांनी सांगितले.



दररोज सकाळी काकडा आरती,पूजा अभिषेक, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन,हरिपाठ, जागर असा तीन दिवस कार्यक्रम झाला, समाजातील पंधरा कीर्तनकार यांनी कीर्तन सेवा केली.

या तीन दिवसात रायगड ठाणे, पालघर व सातारा जिल्ह्यातील अनेकांनी श्रवणसुखाचा लाभ घेतला. या वेळी समाजातील जेष्ठ, सामाजिक कार्यकर्ते यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास ज्येष्ठ नेते हभप. बळीराम शिंदे, अशोक जाधव, अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ अध्यक्ष विठ्ठल मोरे, सरचिटणीस लक्ष्मण जाधव, जितू सकपाळ, एम.डी.चाळके, राजाराम मुसळे, विठ्ठल कदम, डी.डी.मरागजे, मारुती देवरे, उमेश कदम, अशोक मरागजे, सदानंद भातोसे यांच्या सह तिन्ही जिल्ह्यातील वारकरी संप्रदाय व महिला, पुरुष उपस्थित होते.

# अंजुमन महाविद्यालयात उर्दू साहित्याविषयी व्याख्यान

**मुरूड :** अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्समध्ये राष्ट्रीय उर्दू दिन आणि राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त ग्रंथालय समिती, स्पर्धा परीक्षा समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली उर्दू साहित्याचे महत्त्व या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्त्या म्हणून वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या उर्दू विभागप्रमुख डॉ. सीमा नाहिद उपस्थित होत्या.

विद्यार्थ्यांना आधुनिक उर्दू साहित्याचा विकास, प्रमुख साहित्य प्रवाह, बदलते विषय आणि साहित्यिक चिंतन याबाबत माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. आधुनिकतेने उर्दू साहित्याचा कसा बदल घडवला, नवीन प्रवाह कसे उदयास आले आणि आजच्या साहित्यकारांच्या चिंतेचे विषय कोणते यावर त्यांनी सखोल चर्चा केली. या व्याख्यानाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना उर्दू साहित्याचा ऐतिहासिक आणि आधुनिक प्रवास समजावून देणे, प्रमुख साहित्य चळवळींची ओळख करून देणे आणि साहित्याच्या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास घडविणे हे होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून व्याख्यानाला उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

या व्याख्यानाचे आयोजन ग्रंथालय समिती प्रमुख प्रा. अल्ताफ फकीर, ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे आणि स्पर्धा परीक्षा समिती प्रमुख प्रा. तमसील शहजहान, प्रा. जावेदखान मणियार आणि प्रा. बिस्मा किल्लेदार यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आयेशा देशमुख, फातिमा सुर्वे आणि सादिया बालक यांनी विशेष प्रयत्न केले.



# नांदगावमध्ये मोफत आरोग्य शिबिरात ९०० रुग्णांची तपासणी



**मुरूड : प्रतिनिधी**

समर्थ फाऊंडेशनच्या अध्यक्षा ॲड.मनस्वी महेश मोहिते यांच्या संकल्पनेतून ॲड.महेश मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्त श्री समर्थ फौंडेशन व एम.जी.एम.हॉस्पीटल कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगावमध्ये मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी करण्यात आले होते.

नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या मोफत महाआरोग्य शिबिरात विविध विकारांबरोबरच नेत्र तपासणी तपासणी व चष्म्यांचे वाटप तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया आदी बाबत सुमारे नऊशे रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात हृदय विकार तपासणी, अन्ननलिका विकार तपासणी, किडणी विकार, अपेंडिस, मुळव्याध, मेंदूचे विकार,मण्यांचे विकार, सांधेदुखी, गर्भ पिशवी विकार, मुतखडा, कॅन्सर, बालरोग आदींच्या तपासण्या करण्यात आल्या तर नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेबाबत मार्गदर्शन तसेच मोफत चष्म्यांचे वाटप देखील करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन ॲड. महेश मोहिते यांच्या हस्ते ॲड मनस्वी मोहिते, भाजपचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य महेंद्र चौलकर, रमेश दिवेकर, तसेच भाजपचे तालुक्यातील कार्यकर्ते, सदस्य हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. यशवंतनगर पंचक्रोशीतील अनेक गोरगरीब जनतेने या शिबिराचा लाभ घेतला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात एनसीसी दिवस साजरा

**माणगाव : बातमीदार**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU) येथील NCC Unitतर्फे ७८वा राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक सेना (एनसीसी) दिवस दिमाखात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. ए. पी. शेष तसेच पदविका विभागाचे प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे हे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि आयोजन DBATU NCC Unit चे ANO मेजर डॉ. मिलिंद भगत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास एनसीसी एडव्हिसोरी कमिटी(NCC Advisory Committee) चे चेअरमन डॉ. विकास सरगडे विकास सरगडे, सदस्य डॉ. नीरज अग्रवाल आणि डॉ. एस. आर. भगत उपस्थित होते. मान्यवरांनी NCC च्या शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रसेवा जोपासण्यातील महत्त्वपूर्ण भूमिकेवर भाष्य केले.



१७ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एनसीसी सप्ताह (NCC Week)चे आयोजन करण्यात आले असून, या कालावधीत दररोज सकाळी शारीरिक प्रशिक्षण उपक्रम, तर संध्याकाळी बौद्धिक व तार्किक उपक्रम घेण्यात आले. पहिल्या दिवशी रिले रेस व निबंध स्पर्धा, दुसऱ्या दिवशी दोरखे खेच व झझढ प्रेझेंटेशन, तसेच पुढील दिवसांमध्ये खो–खो, PPDT, मॅरेथॉन, समूहचर्चा, कबड्डी, ट्रेझर हंट, फुटबॉल आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

२३ नोव्हेंबर रोजी एनसीसी(NCC) गीताने आठवड्याच्या उपक्रमांचा समारोप झाला. त्यानंतर विविध स्पर्धांतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात NCC Unit यांच्या प्रयत्नातून राबविण्यात आलेल्या या NCC Week मुळे कॅडेट्समध्ये आत्मशिस्त, नेतृत्व, टीमवर्क आणि राष्ट्रनिष्ठेची भावना अधिक दृढ होत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

# लोकलमध्ये विसरलेला लॅपटॉप, वस्तू विद्यार्थिनीला केल्या परत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन वर रेल्वे पोलीस गस्त करीत असताना फलाटावर उभ्या असलेल्या लोकलच्या महिलांच्या जनरल डब्यात एक सॅकबॅग सापडली. ती तपासली असता त्यामध्ये एच पी कंपनीचा चाळीस हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप व काही वस्तू मिळून आल्या. ही सॅक बॅग ज्या प्रवासी विद्यार्थीनीची होत. तिला परत केली.

कर्जत रेल्वे पोलीस शिपाई रेश्मा शेख, पूजा मने आणि प्रमोद चौधरी दिवसपाळी ड्युटी कामी असताना फलाट क्रमांक दोन वर उभ्या असलेल्या सायंकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी आलेल्या लोकल मध्ये मुंबई कडून असलेल्या महिलांच्या जनरल डब्यात एक निळ्या रंगाची सॅक बॅग सापडली. ती बॅग या पोलीस शिपायांनी ठाणे अंमलदार पोलीस हवालदार जितेंद्र जाधव यांच्या समक्ष सदरची सॅगबॅग चेक केली असता सदरच्या सॅकबॅग मध्ये एक एच पी कंपनीचा चाळीस हजार रुपये किमतीचा लॅपटॉप




व इतर वस्तू मिळून आल्या.

सॅग बॅगेत मोबाईल नंबर मिळाल्याने फोनवरून संपर्क करून प्रवासी विद्यार्थीनी कु. सलोनी राजाभाऊ गाडेकर (वय २०, रा. बिड, बुदुक) हिला पोलीस ठाण्यात बोलावले. सॅगबॅग मिळाले बाबत सांगून तुमची सॅगबॅग कर्जत रेल्वे पोलीस ठाणे येथे येऊन खात्री करून दिली, अशी माहिती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांनी दिली.

# द. आफ्रिकेने ठेवले ५४९ धावांचे लक्ष्य

## भारतासमोर कसोटीसह मालिका वाचवण्याचे आव्हान

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

गुवाहाटी कसोटी सामन्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पाच बाद २६० धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला. यासह पाहुण्या संघाने भारतासमोर ५४९ धावांचे टार्गेट सेट केले आहे. त्यामुळे मालिकेत बरोबरीसाठी गुवाहाटीच्या मैदानात उतरलेल्या टीम इंडियासमोर दुसरा कसोटी सामना वाचवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.



कोलकाताच्या मैदानात लो स्कोअरिंग लढत जिंकत मालिकेत आघाडी घेतलेल्या टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेच्या संघाने गुवाहाटीच्या मैदानात पहिल्यांदाच रंगलेल्या कसोटी सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करताना ४८९ धावा केल्या होत्या. तिसऱ्या दिवसाच्या खेळात भारतीय संघाचा पहिला डाव २०१ धावांत आटोपून पाहुण्या संघाने सामन्यात २८८ धावांची आघाडी घेतली होती. टीम इंडियाला फॉलोऑन न देता दक्षिण आफ्रिकेचा संघ पुन्हा फलंदाजीला उतरला. ५ बाद २६० धावा करत ५४८ धावांच्या मजबूत आघाडीसह दक्षिण आफ्रिकेच्या संघाने सामना गमावणार नाही हे निश्चित केले आहे.

दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून स्टब्सने १८० चेंडूत नऊ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने सर्वाधिक ९४ धावा केल्या. टोनी डी झोर्झी याने ६८ चेंडूत केलेल्या ४९ धावांशिवाय मुल्डरने ६९ चेंडूत नाबाद ३५ धावांची खेळी केली. सलामीर रायन रिकल्टन ३५ (६४) आणि मार्करमन २९ (८४) दुहेरी आकडा गाठत दुसऱ्या डावात संघाल चांगली सुरुवात करून दिली. टेम्बा बुवमा फक्त ३ धावा करून तंबूत परतल्याचे पहायला मिळाले. भारताकडून रवींद्र जडेजानं सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करणे टीम इंडियासाठी अशक्यप्राय दिसते. त्यामुळे भारतीय संघाला हा सामना अनिर्णित राखून क्लीन स्वीप टाळण्यासाठी तगडी फलंदाजी करून दाखवावी लागेल.

# आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत माने, चव्हाण चमकले

**नवी मुंबई : बातमीदार**

संयुक्त भारत खेल फाउंडेशनची १२वी आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशीप भूतानची राजधानी थिंपू येथे झाली. या स्पर्धेत रायगड, नवी मुंबईतील खेळाडूंनी ठसा उमटविला.



स्पर्धेत भारत, भूतान, थायलंड, म्यानमार, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया, आणि फिलीपाईन्स या देशातील सुमारे ७६५ खेळाडूंचा सहभाग होता. यामध्ये नवी मुंबईतील सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनी ७०+ वयोगटात लांबउडी, थाळीफेक व हातोडाफेक खेळात सहभागी होऊन तीन सुवर्णपदके जिंकली.

याशिवाय चव्हाण दाम्पत्याने सुयश प्राप्त केले. नवी मुंबईतील सेवानिवृत्त असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस विनोद चव्हाण आणि त्यांच्या पत्नी विभा चव्हाण रायगड जिल्ह्यातील पनवेलचे रहिवासी आहेत. स्पर्धेत विनोद चव्हाण यांनी ६०+ वयोगटात गोळाफेक, थाळीफेक व हातोडाफेक खेळात तीन सुवर्णपदके जिंकली तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी विभा चव्हाण यांनी गोळाफेक व थाळीफेकमध्ये दोन सुवर्णपदके जिंकली. त्यामुळे एकाच घरामध्ये पती-पत्नी या दोघांनी पाच सुवर्णपदके जिंकण्याचा पराक्रम केला. या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# सीकेटी विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी (दि. २४) संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. राहुल घरत यांच्या हस्ते झाले.

महोत्सवाची सुरुवात क्रीडज्योत प्रज्वलाने करण्यात आली. या वेळी सर्व कुलांच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध परेड सादर केली. एनसीसी कॅडेट्स आणि स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनीदेखील परेडमध्ये सहभागी होऊन सर्वांचे लक्ष वेधले.

उद्घाटन समारंभाला सर्व शाखांचे प्रमुख, पर्यवेक्षक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना या वर्षी झालेल्या विविध तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर आतापर्यंत विद्यार्थ्यांनी किती बक्षिसे मिळवली आणि विद्यालयाची परंपरा कायम राखली हे सांगतानाच खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे अ‍ॅड. राहुल घरत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत खेळाद्वारे विकसित होणारे नेतृत्वगुण, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांचे महत्त्व अधोरेखित केले तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यानंतर विद्यार्थ्यांच्या रिलेची स्पर्धा पाहुण्याच्या हस्ते सुरू झाली.




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मराठी माध्यमाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवास सोमवारी (दि. २४) उत्साहात प्रारंभ झाला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष तुषार जाधव, सहसचिव स्नेहा जोशी यांच्या हस्ते; विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या अध्यक्षतेखाली व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ झाला.



या वेळी राष्ट्रीय राज्य, विभागस्तरवर विजय संपादन केलेले शुभ्रा पवार, स्नेहा भोसले, ऐशनी नागोटकर, दिव्या मुळीक, कृष्णा शिंदे, तन्मय पालवणकर, आर्यन पवार, वेद घनवट व इतर विद्यार्थ्यांनी आणलेली क्रीडाज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे व प्रमुख अतिथी संतोष चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा महोत्सवात सहभागी होऊन या स्पर्धांचा आनंद घ्यावा, असे संबोधित करत सर्वांना क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर चारही हाऊसचे कुलप्रमुख, कॅप्टन्स व विद्यार्थी यांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली.

उद्घाटन समारंभास विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजक म्हणून विलास यशवंतराव, ज्योती बडवी यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन सारिका दिवेकर यांनी केले तसेच आभार व्यक्त केले. हा क्रीडा महोत्सव २९ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

# फुंडे विद्यालयाचे क्रीडा क्षेत्रात यश; विद्यार्थ्यांचा गौरव

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले आहे. याबद्दल त्यांचा विद्यालयातर्फे गौरव करण्यात आला.

जिल्हास्तरीय रोल बॉल स्पर्धेत १९ वर्षीय मुले, मुलींच्या गटात फुंडे विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला. या संघांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनकडून घेण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक केशव पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांना वेळी विद्यालयातर्फे गौरविण्यात आले.



या कार्यक्रमाला उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे, ज्युनिअर कॉलेजच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, विभागप्रमुख बी.पी. पाटोळे, दि. रायगड सेवक को-ऑप बँकेचे संचालक किशोर पाटील, वाणिज्य विभागप्रमुख ऋषिकेश धुरी, इतर शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.






# राज्य अजिंक्यपद बेंचप्रेस स्पर्धा मुंबईत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय बेंचप्रेस स्पर्धा २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत मुंबईतील वडाळा येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. क्लासिक व इक्वीपड या प्रकारांची स्पर्धा होणार असून यासाठी नागरिक सहाय्यक केंद्र विश्वस्त मंडळाचे सहकार्य लाभले आहे.



या स्पर्धेसाठी सर्वदूर महाराष्ट्रातून नामवंत खेळाडू येणार आहेत. स्पर्धेमध्ये बौद्धिक अक्षम (गतिमंद), अंध, अपंग मुलांनादेखील संधी मिळणार आहे. याबाबतचे परिपत्रक असोसिएशनचे सरचिटणीस, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई यांनी प्रसिद्ध केले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. स्पर्धेसाठी प्रमुख व्यवस्थापक म्हणून खजिनदार सूर्यकांत गद्रे (९८६९७३६७११), प्रशांत सरदेसाई (९८२०३७६७११) आणि जितेंद्र यादव (९८१९५१३५९०) यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. स्पर्धेला येणाऱ्या सर्व खेळाडूंनी परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे सरदेसाई यांनी कळविले आहे.

# कर्जत भाजपच्या माध्यमातून नमो चषक

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष कर्जत ग्रामीण मंडळाच्या वतीने क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी संस्कृती व लोककलेला चालना देण्यासाठी नमो चषकाचे आयोजन करण्यात आले होते.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त नमो चषकाचे सामने भाजप कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या पुढाकाराने आणि जय गावदेव क्रिकेट संघ धोत्रे व ब्रदर्स ११च्या सहकार्याने कशेळे खांडस येथील मार्गाचे वाडी मैदानावर रंगले. या मैदानामध्ये आदिवासींना आपल्या कला सादर करून संस्कृती जपण्याचे एक व्यासपीठ मिळवून देण्यात आले. नमो चषकामुळे कर्जत तालुका चार दिवस क्रीडा आणि सांस्कृतीमय झाला होता. भाजप कर्जत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नमो चषकाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# ठाण्यात रंगणार कबड्डीचा थरार

**पाली : प्रतिनिधी**

ठाण्यातील सुधागड तालुका रहिवाशांच्या सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणेच्या वतीने संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त २१ डिसेंबर रोजी सुधागड तालुकास्तरीय कबड्डी सामन्याचे आयोजन श्री मावळी मंडळ मैदान, चरई, ठाणे येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सुधागड तालुक्यातील संघांनी ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश फॉर्म पूर्ण भरून संस्थेच्या कार्यालयात सायंकाळी ६.३० ते ९ या वेळेत जमा करावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांनी केले आहे.

१ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता सहभागी संघाचे लॉट्स काढण्यात येतील. यासाठी प्रत्येक संघाचा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश फी ५०० रुपये आहे. प्रवेश अर्ज घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी संस्थेचे क्रीडा समितीप्रमुख राकेश थोरवे (९९८७००२८२९) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com